

मुरुड : छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या पद्मदुर्ग किल्ल्यामागे सूर्यास्ताचा मनमोहक क्षण टिपला आहे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २४६
www.ramprahar.com

सोमवार, २४ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ११ हजार १९७ प्रकरणे निकाली/२

पनवेलमध्ये श्वान व मांजरांचे सर्वेक्षण/३

दोन मुलींना फुस लावून पळवले; महाडमधली घटना/७


# राज्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य

## मुख्यमंत्री फडणवीसांचा नाशिकमध्ये उद्योजकांशी संवाद

**नाशिक : प्रतिनिधी**

विकासाची प्रक्रिया केवळ राज्याच्या एका भागापुरती मर्यादित न ठेवता राज्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅपच नव उद्योजकांपुढे मांडला. कॉन्फडेरेशन ऑफ़ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे पश्चिम क्षेत्र परिषदेने आयोजित संवादात नाशिकच्या विकासालाही चालना देण्याचा निर्धारही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

सीआयआय यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे पश्चिम क्षेत्र परिषदेच्या तीन दिवसीय बैठकीचा समारोप रविवारी (दि.२३) मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संवादाने झाला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सर्वच प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली आणि त्याचबरोबर राज्याच्या विकासाची दिशाही स्पष्ट केली. कार्यक्षम प्रशासन, निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी याद्वारे विकास प्रक्रियेला गती दिली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी कुंभमेळा, त्याअनुषंगाने होणारी विकासकामे याबाबतही त्यांनी नाशिकरांना आश्वस्त केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिकमध्ये औद्योगिक विकासाची मोठी क्षमता आहे. येथील मनुष्यबळ आणि हवामान लक्षात घेता पर्यटन आणि औद्योगिक विकासाला भरपूर वाव आहे. एचएएलमुळे डिफेन्स इकोसिस्टम इथे आहे. मुंबईचा फायदा पुणे, छत्रपती संभाजीनगर शहरांना झाला. समृद्धी महामार्गामुळे आता नाशिकचा अधिकगतीने विकास होणार आहे. देशातील सर्वात मोठे बंदर आता वाढवण येथे होत आहे. नाशिक येथून वाढवणसाठी ग्रीनफिल्ड रोड तयार करणार असल्याने त्याचा खूप मोठा फायदा नाशिक शहराला मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनकडे वाटचाल करत आहे, त्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची १ ट्रिलियन अर्थव्यवस्था २०२९ मधेच होईल यासाठी रोडमॅप तयार आहे. आर्थिक विकासासाठी दळणवळणाची गती महत्वाची आहे. पायाभूत सुविधाही महत्वाच्या आहेत. त्यादृष्टीनेच समृद्धी महामार्ग तयार झाला आहे. शक्तिपीठ महामार्गही तयार करत असल्याचे त्यांनी या वेळी नमूद केले.

### माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरावर भर

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती झाली. दळणवळण सुविधांचा विकास झाल्यास त्याचा लाभ नाशिकला होईल. एआय तंत्रज्ञानाचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने कसा करू शकतो, याकडे अधिक लक्ष दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण

महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी चांगले वातावरण आहे. देशात येणारी सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत आहे. मुंबई, पुण्यासह छत्रपती संभाजीनगर, नागपूर, गडचिरोलीसारख्या जिल्ह्यातही गुंतवणूक होत आहे. पहिल्या तीन तिमाही अहवालात औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

## माजी मंत्री कपिल पाटील यांचे भूमिपुत्र सभेत प्रतिपादन




**डोंबिवली : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, याची कार्यवाही केंद्रात अंतिम टप्प्यात असून लवकरच त्यांच्या नावाची घोषणा होईल, अशी ग्वाही माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी येथे दिली.

या मागणीसाठी मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक आदी जिल्ह्यांतील लाखो प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांनी अनेक आंदोलने केली. या आंदोलनामुळे राज्य सरकारने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचा ठराव मंजूर केला आणि तो राज्य सरकारने पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठवला. हा ठराव केंद्राकडे गेल्यानंतर सर्व पक्षीय कृती समितीतर्फे केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांनाही निवेदन देऊन या मागणीचा पाठपुरावा करण्यात आला त्यामुळे आता



त्या ठरावाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरच 'दिबां'च्या नावाची घोषणा होईल, असे त्यांनी सांगितले.

लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्व पक्षीय कृती समितीतर्फे डोंबिवली येथील प्रगती कॉलेजच्या सभागृहात प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत मार्गदर्शन करताना कपिल पाटील बोलत होते. प्रारंभी अखिल आगरी समाज परिषदेचे मुखपत्र असलेल्या आगरी दर्पण मासिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या सभेला उपस्थित असलेले माजी खासदार संजीव नाईक यांनी सांगितले की, दोनच दिवसांपूर्वी मी दिल्लीला जाऊन यासंदर्भात केंद्रीय मंत्र्यांना भेटून आलो. हा ठराव पंतप्रधान कार्यालयात गेला असून लवकरच घोषणा केली जाईल, असे ते म्हणाले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विमानतळ सुरू होण्यापूर्वी नाव लागेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यानी स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या नोकऱ्यांविषयी माहिती दिली.

या सभेला आमदार राजेश मोरे, माजी आमदार सुभाष भोईर, स्थायी समितीचे अध्यक्ष दीपेश म्हात्रे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संतोष केणे, सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, कृती समितीचे खजिनदार जे.डी. तांडेल, सरचिटणीस दीपक म्हात्रे, अतुल पाटील, गायक जगदीश पाटील, शरद म्हात्रे, दीपक पाटील आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

# हरिहरेश्वरच्या समुद्रात बुडून महिलेचा मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

**सेल्फीचा मोह नडला**

हरिहरेश्वर येथे पर्यटनासाठी आलेल्या ठाण्याच्या महिलेचा येथील तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा ठिकाणी खडकावर सेल्फी घेताना समुद्राच्या लाटांचा अंदाज न आल्याने लाटांच्या तडाख्यात पाय घसरला व लाटांच्या प्रवाहाबरोबर पाण्यात पडल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.२३) घडली आहे.

हरिहरेश्वर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ येथे ठाणे येथील नऊ महिला शनिवारी-रविवार सुट्टी असल्यामुळे मुक्कामासाठी आल्या होत्या. सकाळी देवदर्शन झाल्यावर तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा येथे आल्या होत्या. तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा येथे फोटो काढण्यासाठी प्रदक्षिणा पायऱ्या जवळ जात असताना स्थानिकांनी या महिलांना खडकावर लाटा येत असल्याची कल्पना दिली होती. पाच ते आठ फूट उंच उसळणाऱ्या लाटांबरोबरचा सेल्फीच्या नादात पल्लवी राहुल सरोदे (वय ३७, रा.पाचपाखाडी, ठाणे) (पान २ वर..)

# सर्वोच्च न्यायालयातही आता एआयचा वापर होणार

**नवी दिल्ली :** भारतातील सर्वोच्च न्यायालयातदेखील आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) आणि मशिन लर्निंगचा (एमएल) वापर केला जात आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ न्यायालयाच्या कामकाजाला गती देणे नाही तर न्यायाधीशांना कायदेशीर संशोधनात मदत करणे आहे, असे केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी राज्यसभेत सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रामुख्याने तोंडी युक्तिवाद लिहिण्यासाठी, केस दाखल करण्यासाठी आणि कायदेशीर कागदपत्रांचे भाषांतर करण्यासाठी केला जात आहे. न्यायालयीन निर्णय घेण्यासाठी त्याचा वापर केला जात नाही, असेही मंत्री मेघवाल यांनी म्हटले आहे.

## निवडक

### आजपासून दिल्ली विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारी (दि.२४) सुरू होईल. नवनिर्वाचित दिल्ली सरकारचा पहिला अर्थसंकल्प मंगळवारी (दि.२५) सादर केला जाईल. दिल्ली विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता माध्यमांशी म्हणाले की, कॅगचा अहवालही अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडला जाईल. हे अधिवेशन तात्पुरते २४ मार्च ते २८ मार्च २०२५ या कालावधीत चालणार आहे.

### महाराष्ट्रात आढळला दुर्मीळ प्रजातीचा मासा

**गडचिरोली :** जिल्ह्यात मासेमारांना दुर्मीळ प्रजातीचा सकरमाऊथ कॅट फिश आढळला. शहरालगतच्या कठाणी नदीत मासेमारी करताना हा मासा आढळला. दक्षिण अमेरिकेतील मूळ प्रजाती असलेल्या हा मासा जलीय पर्यावरणासाठी घातक असल्याचे म्हटले जाते. शोभेसाठी ठेवला जाणारा हा मासा चक्क नदीत आढळल्याने पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केलीये. हा मासा इतर सर्व माशांना वेगवान पद्धतीने संपवित असल्याने नागरिकांना सतर्कतेचा इशारा पर्यावरणप्रेमींनी दिलाय.

# पनवेलसह राज्यात इमारत स्वयंपुनर्विकासाची चळवळ यशस्वी होणार

## आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला विश्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इमारतीच्या स्वयंपुनर्विकासाचे पालकत्व स्वीकारले आहे त्यामुळे पनवेलसह राज्यातील स्वयंपुनर्विकासाची चळवळ यशस्वी होणार आहे, आणि या चळवळीला वेग देण्यासाठी शासनाची सर्व मदत होणार आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेतील भाजपचे गटनेते व मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी रविवारी (दि.२३) येथे व्यक्त केले.

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने व पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादित यांच्या विद्यमाने आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने सहकारी गृहनिर्माण संस्थांचा इमारतींचा स्वयंपुनर्विकास या विषयावर शहरातील विरुपाक्ष हॉल येथे मार्गदर्शनपर शिबिर झाले. या शिबिराला मार्गदर्शन करताना प्रवीण दरेकर बोलत होते.




या वेळी मार्गदर्शन करताना प्रवीण दरेकर यांनी भाषणाच्या सुरुवातीला, आज हा एकप्रकारे मेळावा होत असल्याचे सांगत स्वयंपुनर्विकास या मोठ्या चळवळीचे पनवेलकर साक्षीदार होणार असून सर्वसामान्य माणसाच्या फायद्यासाठी आमदार प्रशांत प्रशांत ठाकूर यांनी महत्वाचा विषय हाती घेतला असल्याचे नमूद करत त्यांचे आणि सहकाऱ्यांचे कौतुक केले. तसेच हे अभियान पनवेलमध्ये ताकदीने होणार असल्याचे जाहीर केले. विकासक त्याच्या फायद्यासाठी डेव्हलोपमेंट करतो तर स्वयंपुनर्विकासमध्ये संबंधित संस्था आणि सदनिकाधारकांचा लाभ होतो. स्वतःच्या इच्छेनुसार विकास करता येतो. स्वयंपुनर्विकास यापूर्वी होते पण आता ते चळवळ म्हणून उभी राहिले आहे आणि याला ताकद देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असून या संदर्भात धाडसी निर्णय त्यांनी घेतले आहेत. मुंबईतील गृहनिर्माण संस्थांची परिषद घेतली त्यावेळी २२ हजार लोकांनी नोंदणी केली. या संदर्भातून देवेंद्रजींकडे २० विषय मांडले आणि त्यातील तब्बल १८ विषयावर शासन निर्णय झाले. चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकसित प्रकल्पाच्या सदनिका धारकांना त्यांच्या घरांच्या चाव्या देवेंद्रजींच्या हस्ते देण्यात आल्या, त्यावेळी त्या लोकांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्या ठिकाणी ३६० स्केअर फूटच्या घराला १४०० स्केअर फुटाचे घर मिळाले आणि त्याच धर्तीवर पनवेलला मोठा फायदा होणार असून राज्यातील इतर भागातही स्वयंपुनर्विकसित प्रकल्प राबविण्यात येईल आणि यासाठी सर्वोत्तपरी मदत केली जाईल, असे आश्वासन प्रवीण दरेकर यांनी दिले. घराचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सर्व प्रयत्नशील आहोत त्यामुळे स्वयंपुनर्विकासाठी प्रत्येक सभासदाने इच्छाशक्ती ठेवली पाहिजे पैशाची कमतरता भासू देणार नाही. पनवेलमधील पहिल्या पाच इमारती सुचवा त्यांचे स्वयंपुनर्विकास करण्यासाठी मुंबै बँक पैसे देईल, तसेच पनवेलमधील इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाठी शासन सर्व मदत देईल. त्याचबरोबर पुढील पिढीच्या भविष्यासाठी आत्मनिर्भर आणि स्वाभिमानाने स्वयंपुनर्विकासाठी सहभागी व्हा, असे आवाहनही त्यांनी केले. (पान २ वर..)

### सर्वसामान्यांचे स्वप्न साकार होईल -आमदार प्रशांत ठाकूर

मुख्यमंत्री देवेंद्रजी आणि प्रवीणभाऊंच्या मार्गदर्शनाखाली हे स्वयंपुनर्विकासाचे काम मार्गी लावून सर्वसामान्यांचे स्वप्न साकार केले जाईल आणि त्यासाठी गृहनिर्माण संस्था सदनिका धारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सहकाऱ्यांची टीम तयार केली जाणार असल्याचे सांगून स्वयंपुनर्विकास सर्वसामान्य सदनिकाधारकासाठी चळवळ म्हणून काम करेल, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी गृहनिर्माण संस्था सदनिकाधारकांना दिला.

# पनवेल ते बोरीवली लवकरच थेट लोकल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांचा लोकल प्रवास आणखी सुकर आणि आरामदायी होणार आहे. मुंबई लोकल आणखी अद्यावत व्हावी यासाठी अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे काम सुरू आहेत. लवकरच पनवेल ते बोरीवली प्रवास सुस्साट होणार आहे.

बोरिवली आणि विरार परिसरातील नागरिकांना पनवेल गाठण्यासाठी आता थेट मुंबई उपनगरी रेल्वे अर्थात मुंबई लोकल उपलब्ध होणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने 'एमयूटीपी ३ ब'मध्ये पनवेल-वसई उपनगरी रेल्वे प्रकल्पाचा समावेश केला आहे. पनवेल-वसई लोकल धावल्यानंतर त्याचा विस्तार बेरिवली-विरारपर्यंत करणे शक्य होणार आहे. यामुळे लाखो प्रवाशांचा प्रवास आणखी वेगवान होणार आहे.



मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या 'एमयूटीपी ३ ब' प्रकल्पसंचामध्ये नवीन पनवेल-वसई उपनगरी रेल्वे मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. वसईपासून पुढे बोरिवली आणि विरार अशा दोन्ही दिशांना याची जोडणी असणार आहे. 'एमयूटीपी' अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या रेल्वे प्रकल्पात राज्य आणि केंद्र सरकारकडून ५०:५० प्रमाणे निधी दिला जातो. नवीन पनवेल-वसई लोकल मार्ग सुरू करण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल करण्यात (डीपीआर) तयार आला आहे.

या प्रकल्पाबाबत राज्य सरकारशी प्राथमिक बैठका पार पडल्या आहेत. लवकरच अंतिम बैठका घेऊन नवीन रेल्वे प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. महामुंबईत केवळ पनवेल-दिवा-वसई मार्गावर मुंबई लोकल धावत नाही. सध्या मेमू रेल्वे धावत असून, त्याच्या मोजक्याच फेऱ्या होतात. यामुळे पनवेल-वसई लोकल सुरू करण्याची मागणी सातत्याने प्रवाशांनी लावून धरली आहे, लोकल सुरू झाल्यानंतर या परिसरातील विकासाचा मार्ग प्रशस्त होणार आहे, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

नव्या विमानतळापासून पनवेल रेल्वे स्थानक सुमारे १० मिनिटांच्या अंतरावर आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून पनवेलपर्यंत हार्बर लोकल धावते. पनवेल-कर्जत नव्या रेल्वे प्रकल्पात सध्या रुळांची उभारणी सुरू आहे. मेट्रो ८मुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई विमानतळादरम्यान मेट्रोचा पर्याय मुंबईकरांना उपलब्ध होईल. यामुळे तिन्ही मार्गावरील रेल्वेसह मेट्रोची जोडणी असल्याने रेल्वे प्रवाशांसह विमानतळावर ये-जा करणाऱ्या प्रवाशांनाही याचा लाभ घेता येणार आहे. पनवेल-बोरिवली लोकल झाल्यानंतर वसईतील नागरिकांनाही नवी मुंबई विमानतळावर पोहचणे सोप्प होणार आहे.

# हैदराबाद सनरायझर्सचा दणदणीत विजय

**हैदराबाद :** आयपीएल २०२५च्या १८व्या हंगामातील दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सवर दणदणीत विजय मिळवला. सनरायझर्सच्या २८६ धावांचा पाठलाग करताना प्रत्युत्तरात राजस्थान रॉयलस्चा संघ केवळ २४२ धावाच करू शकला.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने राजस्थानच्या गोलंदाजांची चांगली धुलाई केली. इशान किशनचे नाबाद शतक आणि ट्रॅव्हिस हेडच्या अर्धशतकाबरोबरच सर्वच फलंदाजांनी केलेले दमदार खेळीने सनरायझर्स हैदराबादने अक्षरक्ष: धावांचा पाऊस पाडत राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी २८७ धावांचे लक्ष्य ठेवले होते.

# आता हातरिक्षा ओढणाऱ्यांनाच ई-रिक्षा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी सुरू झालेल्या पर्यावरणपूरक ई-रिक्षा या हातरिक्षा ओढणाऱ्या गरजवंताला मिळाली नसून अन्य रिक्षा मालकांना मिळाल्या होत्या. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आता माथेरानमध्ये हातरीक्षा ओढणाऱ्यांना ई-रिक्षा देण्यात यावी असे येथे सांगण्यात आले असून यामुळे पुन्हा याबाबत निविदा प्रक्रिया काढण्यात येत आहे तसेच सध्यातरी वीस ई-रिक्षा शहरात सुरू राहणार हे निश्चित केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने माथेरान पर्यटनस्थळी सुरू असलेल्या वीस ई-रिक्षाचालकांबाबत आक्षेप घेतल्यामुळे पुन्हा ई-रिक्षा बाबत निविदा काढण्याचे सांगण्यात आले आहे.



२१ मार्च रोजी माथेरान नगरपालिकेकडून निविदा काढली असून जे खरोखरच हातरीक्षा ओढत होते अशाच श्रमिक हातरीक्षा चालकांनी अर्ज दाखल करावा, असे सांगितले आहे. त्याचबरोबर येथील प्रांत अधिकारी यांना माथेरान पालिकेच्या यासर्व प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. येथील उर्वरित हातरीक्षा चालक आपल्या कागद पत्रांची येथे जमवाजमव करीत असून सुट्टीच्या दिवशीसुद्धा नगर पालिकेत जाऊन अर्ज दाखल करीत आहेत. आता या माथेरान पर्यटनस्थळी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खरोखरच जे अनेक वर्ष हातरीक्षा ओढत होते त्यांनाच या पर्यावरण पूरक बॅटरी वर चालणाऱ्या वीस ई-रिक्षाचे स्टेरिंग हातात मिळणार आहे.

हातरिक्षा परवानाधारकांना महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या अटी-शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. ई-रिक्षा वाटपप्रकरणी शासनाचा निर्णय अंतिम राहील.

# गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आली 'आनंदाची' बस

## अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचा शेवटचा जिल्हा असलेल्या गडचिरोली जिल्हा हा अविकसित, अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्याची ही ओळख पुसण्यासाठी जोमाने विकास कामे सुरू केली आहेत. येथील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणून विकासाची फळे चाखण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री पद घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने विकास कामे करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नाने धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी गावासाठी गावकऱ्यांच्या मागणीनुसार राज्य परिवहन महामंडळाने बस फेऱ्या सुरू केल्या आहेत.



या बस फेऱ्यांमुळे संबंधित गावातील नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून ही बस त्यांच्यासाठी निश्चितच 'आनंदाची बस' ठरली आहे.

या गावातील नागरिकांनी रुग्ण, विद्यार्थी आणि आदिवासी नागरिकांच्या सोयीसाठी बस सुरू करण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते.

या निवेदनाची संवेदनशील व्यक्तिमत्व असलेल्या तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी तातडीने दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली विभागीय नियंत्रक यांना बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार धानोरा तालुक्यातील मौजा मुरूमगाव, पेंढरी व रांगी गावात तसेच या गावाच्या मार्गावर बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. बस फेऱ्याही वाढविण्यात आल्या आहेत.

राज्य परिवहन गडचिरोली विभागातील धानोरा तालुक्यातील मुरूमगाव येथे ०३ नियतांमार्फत १० फेऱ्या, पेंढरीकरीता ०३ नियतांमार्फत ०८ फेऱ्या व रांगीकरीता ०२ नियतांमार्फत ०६ फे-या सुरू आहेत. मुरूमगाव येथुन दैनंदिन २८५, पेंढरी येथुन दैनंदिन ३३५ व रांगी येथून दैनंदिन २४२ प्रवासी प्रवास करतात. बस फेऱ्या सुरू झाल्यामुळे संपूर्ण आदिवासी असलेल्या या गावातील आदिवासी बांधवांची मोठी सोय झाली आहे. त्यांना तालुक्याच्या ठिकाणी कार्यालयीन कामासाठी, दवाखान्यासाठी जाणे सोयीचे झाले आहे. ही गावे गडचिरोली सारख्या शेवटच्या जिल्ह्यातील शेवटच्या टोकाची गावे आहे. या गावातून ९ किलोमीटर अंतरावर छत्तीसगड राज्य आहे, अशा अतिदुर्गम भागातील गावकऱ्यांची सोय या बस फेऱ्यांमुळे झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोली जिल्ह्याला स्टील हब बनवून मोठ्या प्रमाणावर उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मागील काही दिवसात अती दुर्गम भागात मुख्यमंत्री यांनी स्वतः बसमध्ये प्रवास करून गडचिरोली आता नक्षलग्रस्त नाही, तर विकासाच्या मार्गावर गतीने धावणार असल्याचे दाखवून दिले आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ११ हजार १९७ प्रकरणे निकाली

## चार जोडप्यांचा लोक अदालतीमध्ये जुळला संसार

**अलिबाग : रामप्रहर वृत**

रायगड जिल्ह्यात आयोजित केलेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण ११ हजार १९७ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, तसेच चार जोडप्यांचा लोक अदालत मध्ये संसार जुळला अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ५२ हजार ८६० वादपूर्व प्रकरणे व १० हजार १५५ प्रलंबित अशी एकूण ६३ हजार १५ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी आठ हजार १७६ वादपूर्व प्रकरणे व तीन हजार २२ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ११ हजार १९७ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण १६ कोटी ६० लाख १४ हजार ९६६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

**संसार जुळलेल्या जोडप्यांचा सत्कार**

जिल्ह्यातील लोकन्यायालयात ४ जोडप्यांचा (रोहा-१, महाड-१ अलिबाग-२) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधिश ए. एस. राजदेकर यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

जिल्ह्यामध्ये एकूण ३५ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना दोन कोटी ७० लाख इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २८ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर व न्यायाधीश तथा सचिव अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाचा पुरस्कार

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) ऊर्जा क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल शुक्रवारी नवी दिल्ली येथे पुरस्कार देण्यात आला.राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.

यावेळी आपल्याला मिळालेला पुरस्कार आपण नम्रतेने स्वीकारत असून याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील ऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनासाठी केलेल्या नेतृत्वाला आहे. तसेच आपल्याला




सहकार्य करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आपण आभारी असल्याचे लोकेश चंद्र यांनी सांगितले

लोकेश चंद्र यांनी जून २०२३ मध्ये महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर वीज ग्राहक केंद्रबिंदू मानून महावितरणच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला. तसेच त्यांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यावर भर दिला आणि राज्याची आगामी काळाची गरज ध्यानात घेऊन ऊर्जा परिवर्तन आराखडा राबविण्यास प्राधान्य दिले.

शेतकऱ्यांना कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा होण्यासाठीची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाचे योगदान दिले आहे. या योजनेमुळे आगामी वर्षात राज्यातील सर्व कृषी पंपांना सौर उर्जेचा पुरवठा करता येईल.

महावितरणने वीज खरेदी करारात अपारंपरिक ऊर्जेवर भर दिल्यामुळे आगामी पाच वर्षात कंपनीचे वीज खरेदीचे एक लाख ३० हजार कोटी रुपये वाचणार असून त्यामुळेच महावितरणने पाच वर्षात टप्प्याटप्प्याने वीजदर कमी करण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे परवानगी मागितली आहे. भविष्यात राज्याची विजेची गरज किती वाढेल व ती कशी पूर्ण करायची याचा सविस्तर रिसोर्स डेक्कसी प्लॅन महावितरणने तयार केला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे २०३० पर्यंत राज्याची ५२ टक्के विजेची गरज ही अक्षय्य ऊर्जेच्या आधारे पूर्ण होईल.

लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात शेतकरी व घरगुती ग्राहकांना रिन्युएबल एनर्जीचा अधिकाधिक उपयोग होण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे मागेल त्याला सौर कृषी पंप योजना राबविण्यात महावितरणने आघाडी घेतली आहे. सौर ग्राम योजनेच्या अंतर्गत गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण करतानाच त्यांना वीजबिलातून मुक्त करण्यात येत आहे. त्याचबरोबर सार्वजनिक पाणी पुरवठा योजना आणि पथदिवे सौर ऊर्जेवर चालविण्यासाठीच्या योजनेसाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महावितरण आघाडीवर असून आतापर्यंत १ लाख १४ हजार ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

लोकेश चंद्र हे आयआयटी दिल्लीचे स्थापत्य अभियांत्रिकेचे पदवीधर आहेत. तसेच त्यांनी एम. टेक पदवी प्राप्त केली आहे. ते १९९३ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. महावितरणच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी सिडकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच नागपूर, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. त्यांनी केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयात संचालक व पोलाद मंत्रालयात सहसचिव म्हणूनही काम केले आहे.



**पेण : धैर्यशील पाटील यांच्या स्नेहसागर बंगल्यावर मोठ्या उत्साहात त्यांचा वाढदिवस कार्यकर्त्यांच्या हजेरीत साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी संसदेत आपल्या खास शैलीत धैर्यशील पाटील यांना त्यांच्या कार्याचा गौरव करत शुभेच्छा दिल्या. धैर्यशील पाटील यांच्या मातोश्री, दोन बहिणी आणि पत्नी, मुली यांनी धैर्यशील पाटील यांना ओवाळून त्यांचे औक्षण केले.**

# करदात्यांनी अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

जीएसटी कायदा नवीन असल्यामुळे सुरुवातीच्या काळात व्यवसायिक, करदात्यांकडून जीएसटी कायद्याचे अनुपालन, कर भरणा करताना अनावधानाने चुका झाल्या आहेत. या चुकांमुळे व्याज आणि दंड याचा आर्थिक भुर्दंड करदात्याला लागू नये, तसेच वस्तू व सेवा कर विवादांचे निराकरण सुलभतेने होऊन विवादित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने जीएसटी अभय योजना सुरु केली आहे. पात्र करदात्यांनी या योजनेचा ३१ मार्च २०२५ पर्यंत लाभ




घ्यावा, असे आवाहन वस्तू व सेवा कर विभागाद्वारे करण्यात आले आहे.

या योजनेत सन २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षाशी संबंधित सीजीएसटी कायद्याच्या कलम ७३ अंतर्गत जारी केलेले मागणी आदेश लाभासाठी पात्र आहेत. या व्यतिरिक्त, ज्या प्रकरणांमध्ये सुरुवातीला कलम ७४ अंतर्गत मागणी आदेश जारी करण्यात आले होते. परंतु अपिल अधिकारी, अपिलीय न्यायाधिकरण किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार हे मागणी आदेश कलम ७३ मध्ये रुपांतरीत झाल्यास अशी प्रकरणे अभय योजने अंतर्गत लाभासाठी पात्र आहेत. योजनेच्या अटी आणि शर्तींच्या अधिन राहून केवळ मूळ रक्कम भरल्यास त्यावरील मुळ रक्कम भरल्यास त्यावरील व्याज व दंड माफ होणार आहे. व्याज व दंड माफिसह अशी प्रकरणे बंद करण्याची संधी या योजनेद्वारे करदात्यांना उपलब्ध आहे.

या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक देय कर भरण्याची अंतिम तारीख दि.३१ मार्च २०२५ आहे. त्यामुळे पात्र करदात्यांनी आवश्यक देय कराचा त्वरित भरणा करुन व्याज व दंड माफिचा लाभ घ्यावा आणि प्रलंबित जीएसटी थकबाकीतून मुक्त व्हावे. आवश्यक स्पष्टीकरण किंवा मदतीसाठी आपल्या नोडल, क्षेत्रीय जीएसटी अधिकाऱ्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वस्तू व सेवा कर विभागाद्वारे करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

प्रारंभी लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्व पक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी आजपर्यंत केलेल्या आंदोलनाचा आढावा घेतला व केंद्रीय मंत्र्यांना भेटून त्याचा पाठपुरावा केल्यानंतर अजूनही हा प्रश्न तसाच रेंगाळत आहे, आता त्यासाठी पंतप्रधानांची भेट घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय आंदोलकांवर घातलेल्या केसेसही मागे घेण्यात याव्यात यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या सभेत मान्यवरांच्या भाषणानंतर आंदोलनात भाग घेतलेल्या आंदोलकांचा दि.बा.योद्धा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेवटी कृती समितीचे खजिनदार जे.डी.तांडेल यांनी आभार मानले.

## हरिहरेश्वरच्या समुद्रात महिलेचा बुडून मृत्यू


ही तरूणी धोकादायक अशा खडकावर जात असताना इतर महिला प्रदक्षिणा पायऱ्यांजवळ थांबल्या, परंतु सेल्फीचा मोह नडला व लाटेच्या तडाख्याने तरूणी खडकावरून पाण्यात पडली.

महिलांचा आरडाओरडा ऐकताच हरिहरेश्वर येथील बोटींग व्यवसायीक अक्षय मयेकर व अमर कवडे या दोघांनी खवळलेल्या समुद्रात बोटीच्या सहाय्याने सदरच्या तरूणीचा शोध घेतला, परंतु पोटात पाणी गेल्याने पल्लवी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

दरम्यान, मयत महिला ही ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक या पदावर कार्यरत होती.

## पनवेलसह राज्यात इमारत स्वयंपुनर्विकासाची चळवळ यशस्वी होणार

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, प्रवीणभाऊ दरेकर यांनी मुंबईमध्ये गृहनिर्माण संस्थेचा स्वयंपुनर्विकास जादूच्या कांडीप्रमाणे केले आहे. आता मुंबईत विविध प्रकल्पासाठी त्यांच्याकडे रांग लागली आहे. मुंबईमध्ये आमदार प्रवीणभाऊंच्या संकल्पनेतून चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकसित प्रकल्पाचे उद्घाटन व गृह चाव्या प्रदान समारंभ संपन्न झाला. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी



बँकेच्या आर्थिक सहाय्याने साकारलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले आणि या कार्यक्रमाला मलाही निमंत्रित केले होते आम्ही त्या ठिकाणी दर्जेदारपणे सोसायट्यांचा पुनर्विकास झाल्याचे पहिले आणि त्या अनुषंगाने हजारो प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे पनवेलमध्येही स्वयंपुनर्विकास उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. आणि यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि प्रवीणभाऊंची ताकद आपल्याला मिळणार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. घर आणि परिवार प्रगतीचा मूळ असतो त्यामुळे चार भिंती आणि डोक्यावर छप्पर असेल तर सुरक्षितता असते. लोकांचे प्रश्न सोडविण्याचे काम आम्हा लोकप्रतिनिधीचे असते असे सांगून पनवेलमधील मोडकळीस आलेल्या इमारतींचे स्वयंपुनर्विकास करण्यासाठी आजच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरुवात झाली आहे.

या वेळी बोलताना आमदार विक्रांत पाटील यांनी म्हटले की, पुनर्विकास करताना जो प्रकल्प साकारला जाईल त्यामध्ये पैसे वाया जाऊ नये हा सर्वांची अपेक्षा असते विकासक चांगला असेल कि नसेल असा प्रश्न सर्वांना पडतो. विकासकाकांडून फसवणुकीचे प्रकार होत असतात. त्यामुळे विकासकाचा फायदा होण्यापेक्षा सदनिका धारकांचा आणि संस्थेचा विकास झाला पाहिजे त्यामुळे स्वयंपुनर्विकास हा उपक्रम महत्वाचा आहे. असेही त्यांनी अधोरेखित केले.

या वेळी माजी निवृत्त सहनिबंधक राजेंद्र पवार यांनीही स्वयंपुनर्विकास संदर्भात मार्गदर्शन केले तसेच यावेळी संस्था, सदनिका धारकांनी उपस्थित केलेल्या प्रश्न व सूचनांना मार्गदर्शन केले. तर प्रास्ताविक पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, आभार प्रदर्शन सल्लागार व माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाला कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे सचिव भरत मोरे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर, अमित ओझे, ॲड. चेतन जाधव, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय भगत, रुपेश नागवेकर, महेश सरदेसाई, अभिषेक पटवर्धन यांच्यासह गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वयंपुनर्विकासाचे फायदे!**

*संबंधित इमारतीचा पुनर्विकास स्वतः सदनिका धारक म्हणजेच सोसायटी करते. या सभासदांना दुप्पट किंवा त्याहून अधिक मोठया क्षेत्रफळाचे घर मिळू शकतील. बिल्डरला मिळणार लाभ सदनिकाधारकांना होईल. वेगवेगळया पायाभूत सुविधांचा विकास करता येईल. त्याचबरोबर रहिवाशी आत्मनिर्भर होतील. सर्वसामान्य सदनिकाधारकांची फसवणुक होणार नाही. हा प्रकल्प सोसायटी करत असल्याने तो वेळेत पुर्ण होऊ शकतो. मुंबईच्या धर्तीवर अशा प्रकारचे प्रकल्प राबवल्यामुळे पनवेलमधील हजारो कुटुंबीयांचे प्रशस्त घरांचे स्वप्न साकारण्यास एक प्रकारे मदत होणार आहे.*

# पनवेल येथे राष्ट्रीय लोक अदालतीत तीन हजार ६८ प्रकरणे निकाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल जिल्हा न्यायालयात शनिवारी (दि.२२) आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व आणि प्रलंबित प्रकरणांचा मोठ्या प्रमाणावर निपटारा करण्यात आला. एकूण तीन हजार ६८ प्रकरणे सामंजस्याच्या आधारे निकाली काढण्यात आली, अशी माहिती जयराज डी. वडणे, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल, रायगड यांनी दिली.

पनवेल न्यायालयात एकूण २३ हजार २९४ प्रकरणे लोकअदालतीसमोर ठेवण्यात आली होती. यामध्ये १८ हजार ९३९ वादपूर्व प्रकरणे आणि चार हजार ३५५ न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांचा समावेश होता. लोकअदालतीतून झालेल्या समेटामुळे एक हजार १२४ वादपूर्व प्रकरणे आणि एक हजार ९४४ प्रलंबित खटल्यांचा तडजोडीच्या माध्यमातून निपटारा करण्यात आला. या प्रक्रियेद्वारे संबंधित पक्षकारांना आणि विविध संस्थांना एकत्रित सहा कोटी १५ लाख दोन हजार ७९० रुपयांची तडजोडीची रक्कम मिळवून देण्यात आली.

पनवेल जिल्हा न्यायालयात लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी सात कक्ष स्थापन करण्यात आले होते. यामध्ये प्रमुख न्यायाधीश, पंच सदस्य आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या लोकअदालतीत जयराज डी. वडणे (जिल्हा न्यायाधीश १ व अति. सत्र न्यायाधीश, पनवेल), ए. एस. बडगुजर (३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), ए. आर. गुन्नाल (सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), के. एम. सोनवणे (२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर), एस. व्ही. साळवी (३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर), पी. सी. बिडकर (४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर) आणि डी. एम. वाघमारे (६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर) यांनी कक्ष प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ, सचिव अ‍ॅड. प्रल्हाद खोपकर आणि संपूर्ण कार्यकारिणी मंडळाने सहकार्य केले.

या लोकअदालतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत व्हिडिओ कॉलच्या माध्यमातूनही खटले सोडवण्यात आले. या वेळी दिपाली म्हात्रे (सहाय्यक अधीक्षक, जिल्हा न्यायालय), हेमंत आंबेतकर, अविनाश चंदने, शैलेश कोंडसकर (विधी स्वयंसेवक, जिल्हा न्यायालय, पनवेल) तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग राहिला.

# पनवेलमध्ये श्वान व मांजरांचे सर्वेक्षण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ए.आय.) माध्यमातून साडेचार महिन्यांत भटके श्वान आणि मांजरींचे सर्वेक्षण पूर्ण केले. नुकताच यासंदर्भातील अहवाल पालिका आयुक्तांना पालिकेच्या पशुवैद्याकीय अधिकाऱ्यांनी सादर केला.

राज्य व देशपातळीवर भटके श्वान आणि मांजरींचे ए.आय. माध्यमातून सर्वेक्षण करणारी पनवेल ही पहिली महापालिका ठरली आहे. पनवेल महापालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख आणि पालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांच्या कारकीर्दीत या सर्वेक्षणाच्या ठरावाला सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली. १९ लाख रुपये खर्च करून पालिकेने श्वानांचे रेबीज निर्मूलन राष्ट्रीय कार्यक्रम योजनेअंतर्गत झायमॅक्स टेक सोल्युशन या कंपनीला इंडिया केअर तंत्रज्ञानाच्या साह्याने सर्वेक्षणाचे काम देण्यात आले.

कंपनीने सर्वेक्षणासाठी प्राणीशास्त्र विषयातील २० पदवीधर तरुणांना यासाठी नेमले. पनवेल पालिका क्षेत्रातील २० वेगवेगळ्या प्रभागांचे १९५ परिभाग करून हे सर्वेक्षण करण्यात आले. एकाच रस्त्यावर किंवा एक गल्ली किंवा एका सोसायटीत वेगवेगळे तीन दिवस एकाच वेळी जाऊन हे सर्वेक्षण केले आहे. सर्वेक्षण अहवालामध्ये पालिका क्षेत्रात सुमारे १९ हजार भटके श्वान आणि पाच हजारांहून अधिक मांजरी असल्याचे वर्तविण्यात आले आहेत. सुमारे नऊ हजार पाळीव श्वान पनवेलमध्ये असल्याचे नमुद करण्यात आले आहेत.

**रेबीजमुक्त पनवेल पालिका ही मोहीम राबविताना भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करणे गरजेचे आहे. ४० टक्क्यांहून अधिक श्वानांचे पनवेलमध्ये निर्बीजीकरण झाल्याचे या अहवालातून समोर आले.**

**–मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल पालिका**

**श्वानांचे लसीकरण, अपघातांवरील नियंत्रण, जन्मदरावर सूक्ष्म नियंत्रण करण्यासाठी कुठल्या प्रभागातील किती श्वान आहेत याची माहिती मिळेल. पालिका सात वर्षांपासून निर्बीजीकरण करत असून त्याची फलनिष्पती समजण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले.**

**–डॉ. वैभव विधाते, उपायुक्त**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात जल दिवस



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२२) नेचर क्लब व स्टाफ वेल्फेअर समितीच्या संयुक्त विद्यमाने जागतिक जल दिवस साजरा करण्यात आला यानिमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी स्लोगन रायटिंग कॉम्पिटिशन घेण्यात आली.

प्रत्येक वर्षी सर्वांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी, २२ मार्च रोजी जगभर जागतिक जल दिवस साजरा केला जातो तसेच प्रत्येक वर्षी एक विषय अथवा थिम घेतली जाते. २०२५च्या जागतिक जल दिनाची थीम हिमनदी संवर्धन आहे, जगातील हिमनद्यांचे संरक्षण करण्याची तातडीची गरज अधोरेखित करण्यासाठी या थिमची निवड करण्यात आली आहे. संपूर्ण पृथ्वीचे जलचक्र राखण्यात हिमनद्यांची भूमिका महत्त्वाची असते.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या स्पर्धेच्या प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना पाणी म्हणजे जीवन आहे व पाण्याचा वापर काटकसरीने केला पाहिजे हे विद्यार्थ्यांना समजावे हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या वेळी विजेतांचे अभिनंदन केले व त्यांना प्रमाणपत्र दिली.

या स्पर्धेचे आयोजन प्रा.डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच नेचर क्लब व स्टाफिलफेअर समितीतील इतर सर्व सदस्य विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

# उलवे नोड येथे लाठी-काठी खेळाचे प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय लाठी महासंघ महाराष्ट्र व भारतीय लाठी महासंघ,नवी मुंबई रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्रांगणात भव्य राज्यस्तरीय लाठी प्रशिक्षण शिबिर व पंच परीक्षा (रेफ्री एक्झाम) रविवारी (दि.२३) झाले.



उद्घाटन समारंभात गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, भारतीय लाठी महासंघाचे अध्यक्ष शिवराम भोसले, उपाध्यक्ष सुरेंद्र शिंदे,सचिव अश्विन कडलासकर तसेच वॉरियर्स क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे, आर.एस.पी.चे समादेशक देवेंद्र म्हात्रे, भारतीय लाठी महासंघ रायगड, नवी मुंबईचे अध्यक्ष ओमकार रंधवे, वॉरियर्स क्लबच्या सहसंचालिका ऋतुजा रंधवे तसेच बिदर कर्नाटक येथून आलेले संतोष वाले, धाराशिव जिल्ह्यातील दिनेश राठोड व यशराज पाचंगे, सातारा जिल्ह्यातून अमीन मुल्ला व प्रताप गुजले,अहिल्यानगर जिल्ह्यातून शुक्रांजली रंधवे तसेच महाराष्ट्रातील १० जिल्ह्याचे व देशातील सहा राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी भारतीय लाठी महासंघ, नवी मुंबई उलवे नोड, रायगडच्या वतीने दांडपट्टा या खेळामध्ये सलग १९ तास दांडपट्टा चालवण्याचा विश्वविक्रम करणारे अश्विन कडलास्कर व त्यांच्या सहा साथीदारांचा विशेष सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच भारतीय लाठी महासंघ, नवी मुंबई, रायगडच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ओमकार रंधवे यांचे तसेच ऋतुजा रंधवे व शुक्रांजली रंधवे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. लाठी महासंघ रायगड नवी मुंबईचे अध्यक्ष ओमकार रंधवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर वॉरियर्स क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे यांनी सूत्रसंचालन केले.

भारतीय लाठी महासंघाचे सचिव अविनाश कडलास्कर, भारतीय लाठी महासंघाचे अध्यक्ष शिवराम भोसले आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी लाठी या पारंपारिक शिवकालीन खेळाचे महत्व विशद केले. प्रशिक्षक अश्विन कडलास्कर, शिवराम भोसले आणि सुरेंद्र शिंदे यांनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना लाठीकाठीच्या विविध प्रकारांचे प्रशिक्षण दिले आणि त्यानंतर दुपार सत्रात पंच परीक्षा झाली.

कार्यक्रमासाठी प्राचार्य गोवर्धन गोडगे, प्राचार्या प्रणिता गोळे, लेखनिक चंद्रकांत मढवी, रयतचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, वॉरियर्स क्लबच्या सर्व प्रशिक्षणार्थी व त्यांच्या पालक यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले.



**उलवे : बिहारचे क्रीडा मंत्री सुरेंद्र महतो आणि शिवसेना नेते संजय निरुपम यांनी सेक्टर-१७ येथील श्री हनुमान मंदिराला भेट दिली. या वेळी त्यांचे हनुमान मंदिर समिती अध्यक्ष अवधेश महतो व भाजप उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. सुनील मौर्य यांनीही स्वागत केले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते एस. सी. मिश्रा, जितेंद्र तिवारी, डॉ. वरुण कुमार, राजेश पांडे, कुलदीप तिवारी, जनक सिंह, राज सिंह, गौतम कुमार, अखिलेश विश्वकर्मा आदी उपस्थित होते.**

## *उमंग उन्हाळी शिबिराला प्रतिसाद*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डीएसआरएफ, ब्रह्मा कुमारी, स्वरसंस्कार म्युझिक अँकडमी, आनंद आंबेश पाठशाळा आणि नील हॉस्पिटल यांनी राजयोग ध्यान केंद्र, नील हॉस्पिटल, नवीन पनवेल येथे आयोजित केलेल्या उमंग उन्हाळी शिबिराला मुलांचा व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुलांनी खेळ, शारीरिक योग आणि ध्यान, क्रियाकलाप आधारित शिक्षण, रेखाचित्र, हस्तकला, गायन आणि इतर क्रियाकलापांचा आनंद घेतला.



नील हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ. शुभदा नील, पनवेल मनपाच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, शंकुतला रामशेठ ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, डॉ. स्वाती लिखिते प्रसिद्ध बालरोगतज्ञ, मंगला बिराजदार, अ‍ॅड सुरेखा भुजबळ, स्वरसंस्कार म्युझिक अ‍ॅकडमी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मंगला गडमुळे, अक्कलकोटे, नाजनिन पालेकर, पिंकी जैन आनंद पाठशाला, प्रभा सिन्हा, जनहित संवर्धक मंडळाचे नरेंद्र गुरव, कृष्णा तिवारी, डॉ.नरेंद्रकुमार दसरे व इतर मान्यवर यांचे विशेष मार्गदर्शन व आशीर्वाद मुलांना लाभले.

# महिलांसाठी आई एकविरा दर्शन सहल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई एकविरा दर्शन या महिलांसाठी एकदिवसीय मोफत सहलीचे आयोजन भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. या सहलीचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.२३) झाला. त्यांनी महिलांना शुभेच्छा देत केदार भगत यांनी राबवलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.




भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत आणि केदार भगत मित्र परिवाराच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पत्रकार विशाल सावंत, शिवसेना शहर संघटक अभिजित साखरे, सुमित दसवते, ब्रिजेश बहिरा, हर्षद गडगे, सचिन भगत, जयेश भगत, संकेत दसवते, यज्ञेश पाटील, शेषनाथ गायकर, अनिकेत सावंत, विशाल सावंत, सचिन जाचक, संतोश वर्तले, कुमार भगत, अनिल भगत, प्रमोद भगत, नितेश भगत, नितीन पाटील, संतोष कथोरे, गीतांजली भगत, निकिता पाटील, सायली भगत, अनिता गायकर, सिमिन साळवी, अवंती गडगे आदी उपस्थित होते.

# कल्पतरु सोसायटीमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील कल्पतरु सोसायटीमध्ये डॉक्टर के.सी डायग्नॉस्टीकच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन रविवारी (दि.२३) करण्यात आले होते. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली.



या वेळी परेश ठाकूर यांनी आरोग्य तपासणी केली तसेच कोरोना काळानंतर नागरीक आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अधीक सतर्क झाले असून या शिबिराचा फायदा नागरीकांना नक्कीच होणार आहेत. त्यामुळे पुढील काळातही अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन व्हावे असे सांगितले. डॉक्टर के. सी.डॉयग्नॉस्टीकच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या सर्व रोग निदान शिबिराला कल्पतरू सोसायटीमधील नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, संजय भगत, चेअरमन प्रशांत ठाकूर, भार्गव ठाकूर यांच्यासह पदाधिकारी आणि सोसायटीमधील नागरीक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये हातमाग, यंत्रमाग कापडांचे प्रदर्शन

## अर्चना ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुढीपाडवा सणानिमित्त पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये हातमाग आणि यंत्रमाग कापडांचे भव्य प्रदर्शन आणि विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन अर्चना ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.२२) झाले.



भाऊराया हॉन्डलुमच्या संयोजनातून २२ मार्च ते ६ एप्रिलदरम्यान हे प्रदर्शन गोखले हॉलमध्ये सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत्त सुरू राहणार आहे. प्रदर्शनात कॉटन, इरकल साड्या, प्रिंटेड साड्या, ड्रेस या सारखे विविध हातमाग आणि यंत्रमाग कापडे उपलब्ध आहेत. या प्रर्दनाच्या माजी नगरसेविका नीता माळी, मोहिणी विक्रांत पाटील, संजीवनी खिलाडे, जोत्सना माळी, हमीदा परमार, सुवर्णा सजदेव, पांडुरंघ पोतन, श्रीधर कटकूर, योगेश पोतन, दिपक गुंडू, गणेश बोलके, रघु कोडम, अमर श्रीराम, मनोज म्हंत, अवधुत चव्हाण, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# सहकार भारतीतर्फे महिलांचा सन्मान

## वर्षा ठाकूर, वैशाली आवाडेंची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार भारती पनवेल महानगर जिल्ह्याच्या वतीने महिलांचा सन्मान सोहळा शनिवारी (दि.२२) आयोजित केला होता. या सोहळ्यात सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षा वैशाली आवाडे आणि वर्षा ठाकूर यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली.

आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि जागतिक सहकार वर्षाच्या निमीत्ताने सहकार भारती पनवेल महानगर जिल्ह्याच्या वतीने संवाद सहकाराचा सन्मान नारीशक्तीचा या सोहळ्याचे आयोजन केले होते. हा सोहळा मार्केट यार्ड मधील श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाला.



या वेळी कमळ नागरी सहकारी पतपेठीच्या अध्यक्षा मालती आंग्रे, सहकार भारतीच्या सहकाय्यक निबंधक भारती काटुळे, दीनदयाल अंत्योदय योजनेच्या शहर अभियान व्यवस्थापक विनया म्हात्रे, रायगड जिल्हा मध्यावर्ती सहकारी बँकेच्या शाखा अधिकारी सुशीला घासे, बचत गट संघटक स्वप्ना साखरे, सारस्वत बँकेच्या ज्युनियर ऑफिसर स्वाती चिंचोलीकर, सुलोचना किनगी, कर्ज वसुली अधिकारी अनिता डुंबरे, सुवर्णा तोंडुलकर, डॉक्टर नीलिमा मोरे, शिवनेरी महिला बचत गट, छत्रपती महिला ग्राम संघ विचुंबे, रायगड महिला बचत गट नवीन पनवेल यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेशच्या महिला अध्यक्षा वैशाली आवाडे, आम्ही उद्योगिनीच्या अध्यक्षा शुभांगी तिरोडकर, वर्षा ठाकूर, मोहिनी पाटील, दीपा राऊत, सहकार भारतीच्या पनवेल महानगर अध्यक्षा त्रिवेणी सालकर, महिला प्रमुख अपर्णा नाडगौडी, पल्लवी कोठावदे, कीर्ती जोशी, पनवेल शहर प्रमुख सुधीर नाडगौडी, उपाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी, कोषाध्यक्ष संजय पावस्कर, सचिव किरण शिंदे, संघटन प्रमुख विश्वास शिंदे, स्मिता शेडगे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# कायदा, सुव्यवस्था सर्वोच्च!

नागपूरमध्ये उसळलेली दंगल त्याच रात्री शमली असली तरी तिच्यावरून चर्वितचर्वण सुरूच आहे. विरोधक ही दंगल शब्दांतून, कृतीतून धगधगत ठेवत आहेत. अशा परिस्थितीत कायद्यापुढे कुणीही मोठे नाही. दोषींवर कारवाई होणारच असे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एक स्पष्ट केलेय.

**राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये सोमवारी रात्री भयंकर दंगल उसळली. महाराष्ट्रावर अनन्वित अत्याचार करणारा, छत्रपती संभाजी महाराजांची निर्घृणपणे हत्या करणारा क्रूरकर्मा औरंगजेबविरोधात राज्यात असंतोष उसळला आहे. छावा चित्रपटानंतर देशप्रेमी नागरिकांच्या भावना प्रज्वलित झाल्या असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथील मुघल प्रशासक औरंगजेबाची कबर हटवून टाकण्याची मागणी जोर धरू लागली आहे. याच अनुषंगाने नागपूरमध्ये औरंग्याची प्रतिकात्मक कबर जाळण्यात आली. खरंतर या प्रकरणी आंदोलकांवर पोलिसांत गुन्हेदेखील दाखल झाले, मात्र आंदोलकांनी प्रतिकात्मक कबर जाळत असताना कुराणची आयत लिहिलेली चादर जळाली असा अपप्रचार काही लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केला आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात गोळा झालेल्या जमावाने तोडफोड केली, गाड्या फोडल्या, लोकांवर तसेच पोलिसांवरही हल्ला केला. पोलिसांनी जवळपास चार-पाच तासांत मोठ्या शर्थीने या दंगलीवर आवर घातला. त्याचप्रमाणे कोम्बिग ऑपरेशन राबवून समाजकटकांची धरपकडही सुरू केली. कायदा व सुव्यवस्थेला ठेस पोहचवून सामाजिक स्वास्थ बिघडवणाऱ्यांवर कडक कारवाई ही झालीच पाहिजे. राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात भूमिका स्पष्ट केलेली आहे. या संदर्भात दुसऱ्याच दिवशी सभागृहात निवेदन ठेवताना त्यांनी नागपूरमध्ये सकाळची घटना घडल्यानंतर मधल्या वेळेत शांतता होती, मात्र संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक हल्ला केल्याचे लक्षात येत आहे. ट्रॉली भरून दगड, शस्त्रे तिथे आढळली आहेत. काही ठराविक घरांना टार्गेट केले गेले. यात पूर्वनियोजित पॅटर्न दिसत आहे, असे सांगत अशा लोकांवर कारवाई केली जाईल. हल्लोखोर कुणालाही सोडले जाणार नाही, असा इशारा दिला. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याची कुणालाही परवानगी दिली जाणार नाही. पोलिसांवर ज्यांनी कुणी हल्ला केला असेल, त्यांना काहीही झाले तरी सोडले जाणार नाही. पोलीस शांतता प्रस्थापित करत होते. अशा वेळी पोलिसांवर केलेला हल्ला करणे चुकीचे आहे. पोलिसांवर झालेला हल्ला सहन केला जाणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. नागपूर दंगलप्रकरणी सर्वकाही कायद्यान्वये होत असताना विरोधकांनी या घटनेचे राजकारण सुरू केले आहे. यावरून आपली पोळी भाजण्यासाठी काँग्रेसने चक्क एक समिती स्थापन केली आहे. दंगलीनंतर तिथे तणाव निर्माण झालेला असताना अशा प्रकारे राजकीय पक्षाने समितीचे नाव पुढे करीत तेथे दौरा करणे चुकीचे होते. पोलीस आपल्या पद्धतीने परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्न करीत असताना इतरांनी तिथे जाऊन वातावरण बिघडेल असे कृत्य करणे उचित नव्हते, पण ऐकतील ते काँग्रेसवाले कसले. याबाबत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी, ज्याच्यावर अकोला दंगलीचा आरोप आहे त्या दंगलीचा आरोपी हा त्यांच्या समितीचा सदस्य. म्हणजे आता दंगेखोर जर दंगलीची चौकशी करण्यासाठी येणार असतील, तर ही समिती म्हणजे अक्षरशः लांगूनचालन आहे. पाय चाटणे आहे, अशी टीका त्यांनी या समितीवर केली. नागपूर हे शांत शहर आहे. १९९२ नंतर शहरात कधीच दंगल घडली नाही. त्यामुळे १७ मार्चला नागपुरात घडलेली दंगल दुर्दैवी आहे. या दंगलखोरांना कायद्यान्वये शासन होणारच आहे.**

# उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची व्यवस्था





मुंबईसह आजूबाजूच्या शहरात ३५ ते ४० अंशांपर्यंत तापमान पोहचल्याने माणसासह प्रत्येक जीव हैराण झाला आहे. म्हणूनच घराच्या अंगणात, गच्चीवर प्राणी-पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच सर्वच ठिकाणी तीव्र उष्णतेच्या झळा लागत आहेत. अशातच अवकाळी पावसाने काही जिल्ह्यात हजेरी लावल्याने तापमानात चढउतार दिसून येत आहे. उन्हाळ्यात ठराविक वेळेनंतर थंड पाणी पिऊन आपण स्वत:ला उन्हापासून वाचविण्याचा प्रयत्न करत असतो. असेच काहीसे प्राणी-पक्ष्यांचेही आहे. त्यांनाही पाण्याची आवश्यकता आहे. पाण्याअभावी अनेक प्राणी-पक्ष्यांचा मृत्यू होतो. निसर्गाच्या साखळीमध्ये प्राणी-पक्ष्यांना देखील सर्वाधिक महत्त्व आहे. यासाठी एक जबाबदार नागरिक, सामाजिक भान, माणुसकी म्हणून आपण प्राणी-पक्ष्यांसाठी, त्यांची तहान भागवण्यासाठी, त्यांचा जीव वाचवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसात तळमळीने प्रयत्न केले पाहिजे. अनेक पर्यावरणप्रेमी, सामाजिक संस्था आज पुढे येऊन काम करत असून आपण देखील घराच्या खिडकीत, अंगणात, इमारतीच्या गच्चीवर प्राणी-पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे गरजेचे आहे.

उष्णतेमुळे होणारा परिणाम हा फक्त माणसांवरच न होता पक्षी आणि प्राणी यांच्यावरही होत असल्याचे दिसते आहे. परळ येथील बाई सक्करबाई दिनशॉ पेटिट हॉस्पिटल फॉर अँनिमल्सने दिलेल्या माहितीनुसार, मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये पक्षी आणि प्राण्यांमध्ये निर्जलीकरण होण्याच्या घटनांमध्ये ३० ते ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ३० विविध प्राणी आणि पक्ष्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. दाखल केलेल्या प्राण्यांमध्ये दोन कासवे, कबूतरे, गरूड, घुबडे आणि कावळे यांचा सामावेश आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे आणि हवामान बदलामुळे चिमण्यांसह इतर पक्ष्यांची संख्या चिंताजनक प्रमाणात घटत आहे. या पार्श्वभूमीवर, कडाक्याच्या उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दाणा-पाण्याची सोय करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक संस्था, संघटना आणि नागरिक पुढाकार घेत आहेत. अनेक जण भूतदया दाखवताना दिसत आहेत.

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमाची सुरुवात रोहा वनविभाग कार्यालय आणि तहसील कार्यालय येथे एक वाटी पाणी ठेवून व आवाहन पत्र वितरित करून झाली. त्यानंतर, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांनी शहरभर घराघरांत जाऊन तब्बल ५०० वाट्या आणि जनजागृती पत्रके वाटली. यावेळी नागरिकांना आपल्या घराच्या आजूबाजूला पक्ष्यांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. शासकीय कार्यालयांमध्ये व घराघरांत जनजागृती करण्यात आली.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमात अनिकेत पाडसे, दिनेश शिर्के, प्रथमेश राक्षिकर, प्रमोद खांडेकर, नंदकिशोर राक्षे, दत्तात्रेय शेडगे, संकेत हजारे, दत्ता वाघमारे आणि इतर स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी लोकांमध्ये पक्ष्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी घरोघरी संपर्क साधला.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील वांगणी गावातील संकल्प मित्रमंडळ आणि उत्कर्ष मित्रमंडळ या दोन संस्था गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करत आहेत. ताम्हिणी घाट आणि भिसे खिंड येथेही पक्ष्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवले जाते. जलस्रोत कोरडे पडल्यावर पक्ष्यांसाठी हे पाणी संजीवनी ठरते. तर सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील पशुपक्षी प्रेमी सचिन मजेठिया हे गेली अनेक वर्षे मोकाट जनावरे आणि पक्ष्यांसाठी अन्न-पाण्याची व्यवस्था करत आहेत. त्यांनी दुकानाबाहेर छोटा हौद बनवून घेतला आहे, जिथे चिमणी, कावळे आणि इतर पक्षी दाण्यापाण्यासाठी येतात.

### पक्षांसाठी थंडगार पाणी

चिमणी आणि इतर पक्ष्यांसाठी थंडगार पाणी मिळावे यासाठी अनेकजण मातीची भांडी बनवून परसात आणि झाडांवर लावत आहेत. पालीतील हभप महेश पोंगडे महाराज, पुई-सिद्धेश्वर येथील तरुण गणेश शिंदे, फणसवाडी येथील निलेश शिंगरे यांनी हा अनोखा उपक्रम राबविला आहे. पालीतील अमित निंबाळकर यांनी आपल्या नर्सरीत आणि घराजवळ झाडांवर चिमण्यांसाठी घरटी बनवून पाण्याची व्यवस्था केली आहे.

### चिमण्यांचे संवर्धन: काळाची गरज

गेल्या काही वर्षांत चिमण्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. पर्यावरणातील बदल, मोबाईल टॉवर्समधून निघणारे रेडिएशन आणि झाडांची कत्तल यामुळे चिमण्यांचे अधिवास नष्ट होत आहेत. या संदर्भात निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्थेने नागरिकांना पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवण्याची सवय लावण्याचे आवाहन केले आहे.

### चिमण्यांना सुरक्षित घर

पालीतील शंतनु लिमये या युवकाने मानवी वस्तीत येणाऱ्या चिमण्यांसाठी निवारा आणि दाण्यापाण्याची व्यवस्था केली आहे. त्यांनी घराभोवती चिमण्यांसाठी खास घरटी बनवली आहेत, जिथे अनेक चिमण्या सहकुटुंब राहतात आणि प्रजनन करतात.

### नागरिकांची जागृती

एक वाटी चिऊसाठी या उपक्रमाचे आयोजक दिनेश शिर्के यांनी नागरिकांना हा उपक्रम केवळ उन्हाळ्यापुरता मर्यादित न ठेवता, वर्षभर पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवण्याची सवय लावण्याचे आवाहन केले आहे. पालीतील शिक्षक जनार्दन भिलारे यांनी आपल्या परसात पक्ष्यांसाठी पाणी आणि खाद्य ठेवले आहे.

### पाचोळा न जाळण्याचे आवाहन

उन्हाळ्याच्या दिवसात झाडांची पानगळ होत असते. हा पालापाचोळा झाडाखाली साचून असतो. पालापाचोळ्याखाली किडे, गांडूळ तयार होतात. ते खाण्यासाठी पक्ष्यांना मेजवानी असते. बऱ्याच वेळा हा कचरा झाडून जाळला जातो. पण हा कचरा जाळू नका व शक्यतो एका ठिकाणी जमा करून ठेवा, असे आवाहन पक्षीमित्रांनी केले आहे. एकतर धुरामुळे प्रदूषण होते शिवाय पक्ष्यांनाही ते त्रासदायक होते. या कचऱ्याखाली मिळणाऱ्या नैसर्गिक खाद्यापासून पक्षी वंचित राहतात.


### अशी करता येईल व्यवस्था!

घरी सावलीच्या ठिकाणी व पक्ष्यांना मुक्त वातावरण मिळेल अशा ठिकाणी मातीच्या पसरट भांड्यात पाणी ठेवावे. पक्ष्यांना आंघोळही करता येईल, असे भांडे असावे.पाण्यासोबतच अन्नाची व्यवस्थाही करता येईल. विशेषत: ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ आदी धान्याचा भरडा उत्तम ठरेल. यासह भाताचे शित व पोळ्यांचे बारीक तुकडे करून ठेवता येतील.पाणी आणि धान्यासाठी प्लास्टिकच्या बाटल्या, बरण्या, तार, दोरी, मातीचे भांडे आदींचा वापर करून फीडर तयार करता येईल. असे कृत्रिम फीडर आता बाजारातही उपलब्ध आहेत.

मातीचे पात्र बांधणे शक्य नसल्यास नारळाच्या करवंटीचा वापर करु शकतो. झाडावर बांधणे शक्य नसेल तर झाडाखाली, सावली राहील तिथे पाणी व धान्य ठेवावे.

उद्यानात जाता-येताना आवर्जून सोबत पाणी घेऊन जा आणि झाडांना टांगलेल्या पात्रात ओता. घरून बाहेर निघताना सोबत पाणी ठेवा जेणेकरून शक्य होईल, त्या पात्रात पाणी भरता येईल.

पक्ष्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण होत आहे. नागरिकांच्या सहभागानेच पर्यावरणाचे संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन शक्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### फोन हरवल्यास डेटाचोरी होऊ शकतो; सुरक्षिततेसाठी हे करा...

आपल्याकडे अनेकांचे मोबाईल चोरीला जातात. आपल्याला मोबाईलपेक्षा आपल्याकडे असलेला डेटा चोरी होईल याची भीती जास्त असते. महत्त्वाचा डेटा चुकीच्या व्यक्तीच्या हाती जाऊ नये म्हणून लगेच पाऊल उचलावी लागतात. यासाठी काही सेटींग करून ठेवावी लागेल.



चोरी झालेला मोबाईल गुगल आणि ॲपलच्या ट्रॅकिंगने शोधता येऊ शकतो. अँड्रॉइड फोनसाठी तुमचा फोन ट्रॅक करण्यासाठी तुम्ही Find My Device वापरू शकता. यासाठी दुसऱ्या फोन किंवा कॉम्प्युटरवरून Google Find My Device वेबसाइट उघडा. हरवलेल्या फोनमध्ये असलेल्या तुमच्या गुगल अकाउंटने लॉगिन करा. जर फोन चालू असेल आणि इंटरनेटशी कनेक्ट केलेला असेल तर तुम्हाला फोनचे ठिकाण दिसेल.

आयफोनसाठी दुसऱ्या डिव्हाइसवर iCloud ओपन करा. नंतर तुमच्या Apple आयडीने लॉगिन करा. याच्या मदतीने तुम्ही डिव्हाइसचे ठिकाण पाहू शकता. ॲपलमध्ये लास्ट नोन लोकेशन फिचर असते.


जर फोन ट्रॅक झाला असेल तर तो ताबडतोब लॉक करा आणि स्क्रीनवर मेसेज टाका. अँड्रॉइडसाठी Find My Deviceवर जा आणि Secure Device पर्याय निवडा आणि फोन लॉक करा. नंतर स्क्रीनवर एक कस्टम मेसेज (उदा. हा फोन हरवला आहे, कृपया या XXXX नंबरवर कॉल करा) दिसण्यासाठी पर्याय निवडा. आयफोन असेल तर iCloudवर जा आणि लास्ट मोड ऑन करा. एक फोन नंबर आणि मेसेज पाठवा. हा मेसेज स्क्रिनवर दिसणार आहे.

तुमच्या नेटवर्क प्रोव्हायडरला संपर्क करा आणि सिम कार्ड ब्लॉक करा. एअरटेलचे सिम कार्ड असेल तर १२१ वर जा. जिओचे सिम कार्ड असेल तर १९९वर कॉल करा. जर वोडाफोन-आयडियाचे असेल तर १९९वर कॉल करा.

ॲप्स आणि ऑनलाईन सेवांना सुरक्षित ठेवण्यासाठी पासवर्ड बदला. गुगल अकाऊंट सिक्युरिटीजवर जाऊन पासवर्ड बदला तसेच फेसबुक आणि इन्स्टाग्रामचे पासवर्ड बदलण्यासाठी वेबसाईटवर जा. नेट बँकिंगचा पासवर्ड बदलण्यासाठी बँकेच्या वेबसाईटवर जावे लागेल.

# स्वरभास्कर, भारतरत्न पं. भीमसेन जोशी

भारतातील ज्येष्ठ शास्त्रीय गायक स्वरभास्कर पंडित भीमसेन यांची आज पुण्यतिथी. त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्नने सन्मानित करण्यात आले होते.



**निमित्त**

भीमसेन जोशी यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९२२ कर्नाटक येथील गदग या ठिकाणी झाला. भीमसेनजींचे वडील पेशाने शिक्षक होते. त्यामुळे भीमसेनजींचा संगीताकडे असणारा कल त्यांना आवडत नसे. त्यामुळे कालांतरानेआपली आवड जोपासण्यासाठी घर सोडावे लागले. त्यांनी पुढे उत्तर भारतात जाऊन उस्ताद अब्दुल करीमखाँ, वझेबुवा, केसरबाई केरकर या सारख्या अन्य उस्तादांकडे त्यांनी गायन-वादन शिकून घेतले. घरी आल्यानंतर त्यांच्या वडीलानी संगीताचा ओढा लक्षात घेऊन कुंदगोळ गावातील रामभाऊ कुंदगोळ यांच्याकडे शिकवणी चालू केली.

रामभाऊ सवाई गंधर्व होते. त्यामुळे शास्त्रीय संगीत शिकवण्याकडे अधिक भर होता. पुढे त्यांनी लवकरच पुण्यातील हिराबागेत आपली पहिली संगीत मैफिल भरवली. विमान प्रवासांमुळे, त्यांना पु.ल. देशपांडे यांनी गमतीने 'हवाईगंधर्व' ही पदवी बहाल केली होती. कित्येक वेळा एकाच दिवसात दोन शहरांतील मैफली घेण्यासाठी ते दोनदा विमानप्रवास करीत असत. भीमसेन जोशींना हिंदुस्थानी शास्त्रीय गायन पद्धतीचे ख्याल गायक म्हणत असले तरी त्यांनी १९४०च्या दशकात लखनऊमध्ये एक वर्ष राहून तेथील प्रसिद्ध गायकांकडून ठुमरी शिकून घेतली होती.

आपल्या गुरूच्या स्मरणार्थ त्यांनी १९५२ सालापासून सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरु केला होता. भीमसेन जोशींना प्रत्येक गायनाचा प्रकार आवडायचा. त्यामुळे जयपूर येथील गंधर्व महाविद्यालयाने संगीताचार्य हि पदवी बहाल केली भारतात शास्त्रीय गायनाच्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन प्रमुख शाखा मानल्या जातात. भीमसेन जोशींचे वैशिष्ट्य असे की ते दक्षिण भारत प्रचलित असलेल्या कर्नाटकी गायनातल्या चीजा हिंदुस्थानी पद्धतीने गाऊन दाखवीत. त्यामुळे त्यांचे गायन कर्नाटकी संगीताची परंपरा असलेल्या दक्षिणी भारतातही, विशेषतः तरुण पिढीमध्ये लोकप्रिय झाले. वसंत बहारनंतर भीमसेनजींनी पुन्हा एकदा हिंदीत ठसा उमटवण्यासाठी अमोल पालेकर यांच्या अनकही चित्रपटातून ते झळकले.

पंडितजीनी आपल्या आयुष्यात सर्वात जास्त प्रेम केलं असेल तर ते फक्त गायनावर. त्यांनी विविध संगीत मैफिलीतून संगीताला चालना दिली. त्यांनी केलेल्या संगीतसेवेमुळे भारतीय शास्त्रीय संगीतात पंडित भीमसेन जोशींचे स्थान अजरामर झाले आहे.

महाराष्ट्र सरकार दरवर्षी भीमसेन जोशी यांच्या नावाचा भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार देते. आतापर्यंत हा पुरस्कार किशोरी आमोणकर, पंडित जसराज यांना मिळाला आहे. अशा या महान गायकाचे २४ जानेवारी २०११ रोजी पुणे येथे वयाच्या ८८व्या वर्षी देहावसान झाले. आज ते शरीररूपी आपल्यात नसले तरी संगीतरूपी सोबत आहेत. **-गोकुळ पवार**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### रोज सकाळी उपाशीपोटी पाणी पिण्याचे फायदे

पाणी हे जीवन आहे, असं का म्हटलं जातं याची कल्पना सगळ्यांनाच आहे. पृथ्वीवरील कोणताही जीव पाण्याशिवाय जगू शकत नाही. रोज सकाळी झोपेतून उठल्यावर पाणी पिण्याचे शरीराला काय फायदे मिळतात हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. यावरून पाण्याचं महत्त्व पुन्हा एकदा तुम्हाला कळेल.



**किडनी-लिव्हर डिटॉक्स**

किडनी जर रोज व्यवस्थित साफ झाली नाही तर शरीरात अनेक विषारी तत्व तसेच जमा होतील. ज्यामुळे किडनी डॅमेज होईल आणि इतरही अनेक समस्या होतील. अशात किडनी साफ करण्यासाठी म्हणजे डिटॉक्स करण्यासाठी रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायला हवं. किडनीसोबतच लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आणि डिटॉक्स करण्यासाठी सुद्धा सकाळी झोपेतून उठल्यावर उपाशीपोटी पाणी पिणं महत्वाचं ठरतं.

**मेटाबॉलिज्म बूस्ट होतं**

रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यानं शरीराचं मेटाबॉलिज्म बूस्ट होतं. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि कॅलरी अधिक जळतात, ज्यामुळे तुम्हाला वजन लवकर कमी करण्यास मदत मिळते.

**डोकेदुखी-अंगदुखी होईल दूर**

जपानी मेडिकल सोसायटीनुसार सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यानं डोकेदुखी, अंगदुखी, ह्रदयाचे आजार, वाढतं वजन, अस्थमा, टीबी, किडनी आणि लघवीच्या आजारांचा धोका कमी होतो.

**त्वचा क्लीन होते**

शरीर आतून साफ करण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी रोज सकाळी पाणी पिणं गरजेचं आहे. रोज सकाळी उपाशीपोटी पाणी प्यायल्यास त्वचेवर याचा प्रभाव दिसून येतो.

**डिहायड्रेशन दूर होतं**

शरीरात पाण्याची कमतरता झाली की, चक्कर येणे, कमजोरी जाणवणे, वजन कमी होणे अशा अनेक समस्या होतात. अशा अनेक समस्या टाळण्यासाठी शरीर हायड्रेट ठेवणं फार महत्वाचं ठरतं. यासाठी रोज सकाळी तर पाणी प्यावंच सोबतच दिवसभर भरपूर पाणी प्यावं.

**ऊर्जा वाढते**

सकाळी उपाशीपोटी पाणी पिऊन दिवसाची सुरुवात केल्यास शरीराची ऊर्जा वाढते. त्यामुळे दिवसभर वेगवेगळी कामे करण्यास तुम्हाला मदत मिळते.

# बच्चू कडू यांचे उपोषण मंत्री योगेश कदमांच्या आश्वासनानंतर संपले

**महाड : प्रतिनिधी**

अपंगांचे नेते माजी आमदार बच्चू कडू यांचे गेल्या दोन दिवसापासून किल्ले रायगड पायथ्याला सुरू असलेले उपोषण आज अखेर मंत्री योगेश कदम व मंत्री भरत गोगावले यांच्या मध्यस्थीने समाप्त झाले असून मंत्री महोदयांच्या आश्वासनानंतर उपोषण थांबविण्यात आले आहे.

अपंग कल्याण मंत्रालयाचे माजी आमदार बच्चू कडू हे गेल्या दोन दिवसापासून किल्ले रायगडच्या पायथ्याला अपंगांच्या विविध प्रश्नांविषयी व शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी उपोषणाला बसले होते त्यांचे हे उपोषण म्हणजे लक्ष वेधून घेण्यासाठी असलेली एक स्टंटबाजी होती. काल सायंकाळी बच्चू कडू यांची तब्येत अचानक खालावली, त्यांना जवळच्याच पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्र उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपाशी राहील्याने त्यांची ब्लड शुगर लेवल खाली आल्यामुळे त्यांची तब्येत बिघडली असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे होते.

यानंतर मंत्री योगेश कदम व मंत्री भरत गोगावले यांनी आज सकाळी त्यांच्या पाचाड उपोषण स्थळाला भेट देऊन येत्या दहा दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून अपंगांच्या प्रश्नावली बाबत निर्णय घेणार असल्याचे सांगितले तसेच स्थापन केलेले अपंग मंत्रालय पुन्हा एकदा कार्यान्वित करून अपंगांचे प्रश्न सोडविले जातील, असे आश्वासन कदम यांनी या वेळी दिले. दरम्यान, योगेश कदम व भरत गोगावले यांच्या हस्ते जल प्राशन करून बच्चू कडू यांनी आज आपले उपोषण आंदोलन संपवले. तसेच यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी देखील माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या ठिकाणी भेट दिली. या ठिकाणी प्रहार संघटनेच्या वतीने या आंदोलन दरम्यान रक्तदान शिबिरदेखील घेण्यात आले

या वेळी जवळपास ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून या आंदोलनामध्ये सहभाग नोंदवला.



## महावितरण अभियंता आणि भंगार ठेकेदाराने दिड कोटीचा माल हडपला

### रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**




आपटा विद्युत उपकेंद्रात उपकार्यकारी अभियंता म्हणून काम करीत असताना योगेश रहांगदळे यांनी भंगार ठेकेदार आणि अन्य साथीदारांच्या मदतीने एक कोटी ५७ लाख १५ हजार रूपये किंमतीचा स्क्रॅप कंडक्टर मालाची परस्पर विल्हेवाट लावल्या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

योगेश रहांगदळे जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत आपटा उपक्रेंदाचे तत्कालीन उप कार्यकारी अभियंता होता. या कालावधीत भंगार ठेकेदार आणि अन्य एकाला हाताशी धरत योगेश यांनी पदाचा गैरवापर करत साठवणूक केलेले स्क्रॅप कंडक्टर असक ११२.२५ मेट्रिक टन वजनाचा माल स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी संगनमताने अपहार करून महापारेषण कंपनीचे आर्थिक नूकसान करुन फसवणूक केली. याबाबतची तक्रार सध्या कार्यरत अतिरिक्त कार्यकारी अभियंता ब्रम्हू नरसिंग चव्हाण (वय४६) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात दिली आहे.

रसायनी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रमोद जाधव, हे करीत आहेत.

## इंदरदेव येथील धनगर बांधवांना वणव्यात जळालेल्या घरांची पुनर्बांधणी करून देणार -मंत्री आदिती तटकरे

**नागोठणे : प्रतिनिधी**

इंदरदेव धनगरवाडा हा मला परिचित असून वणव्याची आग लागून अनेक घरे जळून नष्ट झाली ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यासाठी मी शासनाच्या वतीने या सर्व गावकऱ्यांची जळालेली घरे त्याच जागी उभारून पुनर्बांधणी करून देणार अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

रोहा शहरापासून काही अंतरावरील डोंगरावर वसलेल्या इंदरदेव धनगरवाड्याला ६ मार्च रोजी वनविभागाच्या हद्दीतून आलेल्या वनव्याने आग लागून या भीषण आगीत येथील सुमारे ४४ घरे, १२गुरांचे गोठे व तीन पडकी घरे जळून भस्मसात झाली होती. या दुर्घटनेची माहिती येथील गावकऱ्यांनी स्थानिक प्रशासनाला देताच



प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन येथील ग्रामस्थांना प्राथमिक स्वरूपात लागणारी संपूर्ण मदत केली.

मात्र रोहा तालुक्यातील मौजे धामणसई हद्दीतील इंदरदेव धनगर वाड्यातील घरांचे वणव्यामुळे प्रचंड नुकसान होवून ग्रामस्थ बेघर झाले आहेत. उध्वस्त जीवन झालेल्या येथील गावकऱ्यांनी प्रशासनाकडे घरांच्या बदल्यात घरेअसे म्हणत आम्हाला आमची घरे आहेत त्याच जागेत बांधून द्यावी अशी प्रमुख मागणी केली होती.

यासंबंधी महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री नामदार आदितीताई तटकरे यांनी शुक्रवार दि.२१मार्च रोजी मुंबई येथील विधानभवनाच्या आपल्या दालनात इंदरदेव धनगरवाडा येथे लागलेल्या आगीमुळे झालेल्या नुकसान याविषयी सभा आयोजित केली होती.

इंदरदेव धनगरवाडीला रस्ता नसल्याने येथे लागलेल्या आगीवर नियंत्रण करण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या वेळेवर पोहचू शकल्या नाहीत. रस्त्याची समस्या ही पूर्वापारपासूनची आहे. वनविभागाच्या परवानगीमुळे अडलेल्या या अडीच किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी वनविभागाने सहकार्य करावे असेही त्यांनी आदेश दिले. तसेच इंदरदेव धनगरवाडा व ठाकूरवाडी ला जाण्यासाठी रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रुपपंचायत धामणसई यांनी ठराव करून त्वरित प्रस्ताव सादर करावा असेही त्यांनी सांगितले.

या सभेसाठी रोहा येथील उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, रोहा तालुका तहसीलदार डॉ.किशोर देशमुख, रोहा पंचायत समिती गटविकास अधिकारी शुभदा पाटील, रोहा वनपरिक्षेत्राचे वनाधिकारी मनोज वाघमारे, सहाय्यक वनरक्षक रोहित चोबे, ग्रामविकास अधिकारी निता श्रीवर्धनकर, पिंगळसई येथील आप्पा देशमुख, अनंता देशमुख, इंदरदेव धनगरवाड्यातील ग्रामस्थ मंगेश कोकळे, अनंत कोकळे आदी उपस्थित होते.

## मंगळवारी पोलादपूरला किसान गप्पा गोष्टी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी अधिकारी पोलादपूर कार्यालयामार्फत मंगळवार दिनांक २५ मार्च २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृह, पोलादपूर येथे आत्मा योजनेअंतर्गत किसान गप्पा गोष्टी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. याप्रसंगी बांबू तज्ञ श्रीमती अनुराधा काशीद कार्यक्रमास मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

किसान गप्पा गोष्टी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती महाड उपविभागीय कृषी अधिकारी वैभव खटकाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमास शेतकरी बांधवांनी उपस्थित राहून कृषी विभागातील शासकीय योजनांची माहिती तसेच विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन तालुका कृषी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

द बांबू सेतू भोरच्या संस्थापिका बांबू तज्ञ श्रीमती अनुराधा काशीद यांचे अमूल्य मार्गदर्शन मिळणार असल्याने शेतकरी वर्गाने ठीक १० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केलेले आहे.

## जलदगती गाडयांना पेण थांबा द्या

### खासदार धैर्यशील पाटील यांची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे आग्रही मागणी

**पेण : प्रतिनिधी**



दिल्ली येथे झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी सोमवार (दि.१७) रोजी संसदेमध्ये पेण रेल्वे स्थानकात दिवा सावंतवाडी दिवा, जलदगती रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा व पेण रेल्वे स्थानक नूतनिकरण करणेबाबतची आग्रही मागणी सभागृहात करून सरकारचे लक्ष वेधले होते.

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर आणि तिसरी महामुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेण तालुक्याचा विकास पाहता येथे जलदगती रेल्वे आणि दिवा–सावंतवाडी या लांब पल्ल्याच्या गाड्यांना पेण स्थानकात तत्काळ थांबा उपलब्ध व्हावा, अशी मागणी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांनी अधिवेशनात करून याबाबतचे पत्र रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना दिले आहे.

पेणच्या विकासाला गती मिळण्याकरिता येथे लांब पल्ल्याच्या जलदगती रेल्वे गाड्या थांबणे गरजेचे आहे. याकरिता अनेकदा आंदोलनेही झाली आहेत. गणेशमूर्तीचे माहेरघर म्हणून पेणची जगभरात ओळख आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येथे गणेशभक्त येतात. त्यांच्या सोयीसाठी पेण रेल्वेस्थानकात लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या तसेच सावंतवाडी गाडीला येथे थांबा मिळावा,अशी मागणी केली

# मुंबई–गोवा महामार्गावरील पश्चिमेकडील सर्व्हिस रोडच्या कामाला गती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील पोलादपूर शहरातील पश्चिमेकडील सर्विस रोडची लांबी नियोजित आराखड्यापेक्षा कमी असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर आराखड्यानुसार सर्विस रोडची लांबी वाढविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले आहे. मात्र काही गृह निर्माण प्रकल्पामुळे अद्याप २५० मीटर पर्यंत लांबी कमी असल्याचे दिसून येत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ चे चौपदरीकरण पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाजवळ पूर्णत्वास गेले आहे. मात्र, पोलादपूरच्या पश्चिमेकडील सर्व्हिसरोड आणि त्यावरील ड्रेनेज कम फूटपाथचे काम पूर्ण झाले असून त्या सर्व्हिसरोडची रूंदी ७.५० मीटर्स तर लांबी १०८० मीटर्स तर ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असल्याचे राष्ट्रीय महामार्गाच्या अंतिम आराखडयामध्ये नमूद करण्यात आले आहे.

पोलादपूर शहरातील ग्रामीण रूग्णालयासह पार्टेकोंडपर्यंत सर्व्हिसरोड व ड्रेनेज कम फुटपाथ असूनही हा पश्चिमेकडील सर्व्हिसरोड प्रभातनगर पश्चिमपर्यंतच दिसून येत आहे. पोलादपूर घाटेआवाड येथे आराखड्यानुसार ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असण्याऐवजी केवळ दोन फूट असलेली दिसून येत आहे. प्रत्यक्षात आणि आराखडयामध्ये असलेल्या लांबी रूंदीतील तफावतीमुळे पश्चिमेकडील



सर्व्हिसरोड ग्रामीण रूग्णालयाच्या प्रांगणातून पार्टेकोंडपर्यंत न जाता त्याआधीच प्रभातनगरपर्यंत संपलेला असल्याने ग्रामीण रूग्णालयापर्यंत रूग्ण आणि रूग्णवाहिका येण्यासाठी अडचण निर्माण झाली असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे पत्रकारांनी लक्ष वेधले होते.

पश्चिमेकडील सर्विस रोड ची लांबी काटेतळी रस्त्यापासून उंबरकोंड रस्त्यापर्यंत अशी एकूण १०८० मीटर्स नवीन नियोजित आराखड्यात दाखविण्यात आली आहे. मात्र, हा सर्व्हिस रोड कोल्हापूरचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ देवस्थानच्या कमानी नंतर काही मीटर अंतरावर चौपदरीकरणाच्या अंडरपास बॉक्स कटिंग महामार्गावर जोडला जाऊन संपुष्टात आला होता. यामुळे१०८० मीटरची लांबी पश्चिमेकडील सर्विस रोडला मिळाली नसल्याने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयापर्यंत जाणाऱ्या वाहनांना तसेच पादचाऱ्यांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. रस्ता दुभाजकावरून ग्रामीण रुग्णालयाकडे पायी अथवा वाहनाने येताना अपघात घडले असल्याने पश्चिमेकडील सर्विस रोडची लांबी आराखड्यानुसार उंबरकोडपर्यंत वाढवण्याची गरज स्पष्ट झाली होती. यामुळे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या दौऱ्यात प्रस्तुत प्रतिनिधीने ही बाब निदर्शनास आणली होती.

यानंतर काही दिवसातच पश्चिमेकडील सर्विस रोडची लांबी वाढवण्याचे काम सुरू झाले सध्या स्थितीत हे काम जय हनुमान नगर वसाहतीपर्यंत पोहोचले असून त्यापुढे काही अंतरावर दोन खाजगी गृहनिर्माण प्रकल्पांचे काम सुरू असल्याने तब्बल २५० मीटर्स अंतर आधीच हा सर्व्हिस रोड करण्यात आल्याने नियोजित उंबरकोंड फाट्यापर्यंत सर्विस रोड न पोहोचविण्यामागे कोणाचे हितसंबंध जोपासले जात आहेत, असा प्रश्न पोलादपूरवासियांकडून उपस्थित केला जात आहे. महामार्ग बांधकाम विभागाने सद्यस्थितीत सुरू असलेला पश्चिमेकडील सर्विस रोड नियोजित आराखड्यानुसार उंबरकोंड फाट्यापर्यंत पोहोचवण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कानसेवाडी 'स्वप्नातील गाव' म्हणून प्रमाणित

**माणगाव : बातमीदार**

स्वप्नातील गाव म्हणून स्वदेश फाउंडेशनने कानशेवाडी या गावाला प्रमाणित केले आहे. गावकऱ्यांनी स्वप्नातील गाव फलकाचे अनावरण करून आलेल्या मान्यवरांचे ढोल ताशा लेझीम नृत्य करून स्वागत केले.

या वेळी गाव विकास समिती, ग्रामस्थ आणि मुंबईकर यांनी मोठ्या उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमासाठी ग्राम पंचायत सरपंच रमेश कानसे, स्वदेस फाऊंडेशनचे उप–संचालक प्रसाद पाटील, वरिष्ठ व्यवस्थापक विशाल वरुठे, वरिष्ठ व्यवस्थापक शिवतेज ढऊळ, व्यवस्थापक नाथाजी कटारे, वरिष्ठ समन्वयक चेतन सवादकर, तसेच तालुका शाशकीय अधिकारी गट विकास अधिकारी माधव जाधव, पोलिस




निरीक्षक संदीप कहाळे, कृषी विभाग अधिकारी राजेंद्र ढंगारे, आदिनाथ गायकवाड, पाभरे विभाग विकास समिती अध्यक्ष महादेव पाटील उपस्थित होते.

स्वप्नातील गाव फलकाचे अनावरण करून आलेल्या मान्यवरांचे ढोल ताशा लेझीम नृत्य करून स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबई मंडळ अध्यक्ष धोंडू काणसे यांनी केले, तर प्रस्तावना मुंबई सचिव संजय गोणबरे यांनी केली. गाव विकास समितीचे अध्यक्ष हरिश्चंद्र कानसे यांनी कानसेवाडी गावाच्या परिवर्तनाची प्रेरणादायक कथा सांगितली. त्यांनी विशेषतः स्वदेस आणि शासन यांच्या माध्यमातून गावात राबवलेल्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. हे सर्व झालेले कायापालट गाव विकास समिती अध्यक्ष हरिश्चंद्र काणसे, सर्व समिती सदस्य, ग्राम पंचायत सरपंच रमेश काणसे, सर्व ग्रामस्थ विशेष म्हणजे महिला यांनी केलेल्या मेहनतीतून आणि एकजुटीतून झाल्याचे सांगितले. यामध्ये पाणी योजना, फळबाग लागवड, गाव स्वच्छता, गाव सुशोभिकरण, गावाच्या वाहतूक सुविधांमध्ये सुधारणा तसेच रोजगार आणि जीवनमान सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न यांचा समावेश होता.

प्रमुख पाहुण्यांनी कानसेवाडी गावातील विविध उपक्रमांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्वदेस टीमच्या मार्गदर्शनाखाली गावातील महिलांनी आणि मुंबईकरांनी विविध सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम राबवले. रस्ते, भिंतींवर रंगकाम, वारली पेंटिंग्स, भिंतीवर संदेश लेखन आणि टाकाऊ वस्तू पासून सजावट असे अनेक सुंदरतेचे उपक्रम राबवून गावच्या सौंदर्यात भर घातली.

गावकऱ्यांना या ऐतिहासिक यशाबद्दल अभिमान वाटत असून, या यशाचे श्रेय गावातील प्रत्येक नागरिकाला दिले जात आहे. भविष्यात आणखी मोठ्या पावलांनी प्रगती साधण्याचा ठराव घेतला

## तुपगावात कुंभार काम प्रशिक्षण शिबिर

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

कुंभार समाज सामाजिक संस्था, रायगड व वस्त्र उद्योग मंत्रालय हस्तशिल्प विभाग (भारत सरकार) आयोजित कुंभार काम प्रशिक्षण शिबिर श्री संत गोरोबाकाका मंदिर तूपगाव चौक येथे कुंभार काम प्रशिक्षणाची सुरुवात सुरेश नारायण तांडेकर (सहाय्यक निदेशक हस्तशिल्प) यांच्या हस्ते करण्यात आली.

संत गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पूजन करून कुंभार कामाच्या चाकाच पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात तीस कुंभार बांधव, बंधू आणि भागीनींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

आजपासून पुढील पन्नास दिवस कुंभार काम प्रशिक्षण शिबिर चालणार आहे. सुरेश दांडेकर साहेब म्हणाले की कुंभार काम प्रशिक्षणातून कुंभार बांधवांना रोजगार मिळणारे आहे. यातून तुमच्या कुंभार समाजाची उन्नती होणार आहे



**Hiring Audit Staff**
Fresh/ Experienced Audit staff required for CA firm
at Hiranandani fortune city, Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada, Panvel
Contact: 8390407010

# नवी मुंबईत जलसंवर्धनाला प्राधान्य

## जागतिक जलदिनानिमित्त ठिकठिकाणी सामुहिक शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

पाणी ही जीवनावश्यक गोष्ट असून पाण्याला जीवन असेही संबोधले जाते. पिण्यायोग्य पाण्याचे पृथ्वीवरील अत्यल्प प्रमाण लक्षात घेऊन उपलब्ध जलस्त्रोतांचे संवर्धन करणे व पाण्याचा काटकसरीने वापर करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे लक्षात घेत संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ पासून २२ मार्च हा दिवस 'जागतिक जल दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. पाण्याच्या शाश्वत व्यवस्थापनाचे महत्व अधोरेखित करीत जगभरात संपन्न होणा–या यावर्षीच्या जागतिक जलदिनाचा विषय 'हिमनदी संवर्धन' हा आहे.

या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक जल दिनाचे औचित्य साधून 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विविध विभागांमध्ये जलजागृतीविषयक विविध उपक्रम राबविण्यात आले. महानगरपालिकेचे विविध विभागांमध्ये असणारे जलकुंभ तसेच पम्पींग हाऊस



त्याचप्रमाणे मोरबे धरण प्रकल्प व भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र याठिकाणी सामुहिक जलशपथ घेण्यात आली. अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे व इतर अभियंते व अधिकारी, कर्मचारी ठिकठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे या वेळी स्थानिक नागरिकांनीही सहभागी होत जलशपथ घेतली.

आपण या वसुंधरेला वाचवू शकतो आणि आपले भविष्य सुरक्षित करु शकतो. यासाठी देशाचा जलरक्षक म्हणून कायम कार्यरत राहण्याची मी शपथ घेत आहे अशा आशयाच्या जल शपथेमध्ये पाणी बचत व पाण्याचा विवेकी वापर करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच पाण्याचा थेंब अन् थेंब साठवून 'कॅच द रेन' या अभियानाच्या यशस्वितेसाठी मी संपूर्ण सहयोग देईन व पाण्याला एक अनमोल संपदा मानून पाण्याचा वापर करेन अशीही शपथ घेण्यात आली. पाण्याचा विवेकी वापर करण्याबाबत व पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत मी, माझे कुटुंबिय व मित्र आणि शेजाऱ्यांना प्रेरीत करेन असेही प्रतिज्ञेत नमूद आहे.

**पालिकेकडून नागरिकांना आवाहन**

नवी मुंबई हे स्वत:च्या मालकीच्या मोरबे धरणामुळे जलसमृध्द शहर असले तरी प्रत्येक व्यक्तीने स्वत:ला किती पाण्याची गरज आहे हे ओळखून पाण्याचा आवश्यक तेवढाच वापर करण्याचे आवाहन फ्लेक्स बॅनर्स, स्टँडीज्, होर्डींग अशा विविध माध्यमांतून जागतिक जलदिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# कळंबोली येथील आरटीओ कार्यालय लवकरच खारघरमध्ये

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजाराच्या इमारतीमध्ये पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे (आर.टी.ओ.) कार्यालय सुरू आहे. हे कार्यालय काही दिवसांत स्थलांतरित होऊन खारघर येथील सेक्टर ३६ मधील व्हॅलीशिल्प सोसायटीच्या आठ गाळ्यांमध्ये सुरू होणार आहे. याबाबतच्या प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरीचे आदेश राज्याच्या गृहविभागाने जाहीर केले. एप्रिल महिन्यात पनवेल आरटीओ कार्यालय खारघर येथे प्रत्यक्षात स्थलांतरीत होईल असे संकेत मिळत आहेत.

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजार समितीच्या सामायिक इमारतीमध्ये मागील १४ वर्षांपासून आरटीओ कार्यालयाचा कारभार सुरू आहे, मात्र लोखंड पोलाद बाजार समितीची सामायिक इमारत पनवेल महापालिकेने धोकादायक घोषित केली होती. धोकादायक इमारतीमधून कामकाज सुरू असल्याने येथील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी या इमारतीमधील अनेक सरकारी कार्यालये हलविण्यात आली. पनवेल आरटीओ कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पनवेल तहसिलदार, पनवेल महापालिका आणि सिडको मंडळाकडे जागेची मागणी करण्यात आली होती.

सिडको मंडळाने आरटीओच्या मागणीला प्रतिसाद देत खारघर उपनगरातील सेक्टर ३६ येथील व्हॅली शिल्प को.ऑ.हौ. सोसायटीमधील इमारतीत जागा भाडेतत्वाने देण्याचा निर्णय घेतला. ११ महिन्यांचे भाडे ४६,६४,७३४.३५ रुपये आहे. यापैकी तीन महिन्यांचे भाडे आणि कागदपत्रांची रक्कम सिडकोला आगाऊ द्यावी लागणार आहे. पुढील आठवड्यात सोमवार ते मंगळवारी आरटीओ कार्यालयाकडून सिडको मंडळाला भाड्याच्या रकमेचा धनादेश दिल्यानंतर भाडेकरार झाल्यावर आरटीओच्या ताब्यात हे गाळे येतील. त्यामुळे एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात कार्यालयाचे स्थलांतर सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पनवेल आरटीओ कार्यालयासाठी सिडको मंडळाने तळोजा मजकूर येथील पावणेतीन एकर क्षेत्राचा भूखंड दिला आहे. आरटीओ कार्यालयाने या जागेच्या मोबदल्यात विकास शुल्क देखील सिडको मंडळाकडे डिसेंबर महिन्यात जमा केले आहे, परंतु प्रत्यक्षात जागेवर विकसित भूखंडाऐवजी ती जागा उंचसखल आणि त्या जागेतील मोठा भागाला तलावाचे रूप आल्यामुळे सिडको मंडळाने हा भूखंड व्यवस्थित विकसित करून देण्याची विनंती आरटीओने सिडकोकडे केली आहे. सिडकोने विकसित भूखंड दिल्यावर पनवेल आरटीओ कार्यालय हक्काच्या जागेत उभारण्याच्या कामाला वेग येईल.

# कोपरखैरणेत अतिक्रमणविरोधी विभागामार्फत धडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महापालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत सेक्टर १७ येथील एस.एस. टाईप, रूम नं ५१०, रूम नं ५१२, रूम नं ५११ यांच्या बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या धडक मोहिमेसाठी आठ मजूर, दोन इलेक्ट्रॉनिक हॅमर, पिकअप व्हॅन एक यांचा वापर करण्यात आला.

या मोहिमेकरीता ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी वसंत मुंडावरे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व जी विभाग ऐरोली, येथील अधिकारी, कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलीस पथक उपस्थित होते.

# स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत नागरिकांच्या प्रतिसादासाठी विशेष पथके

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने स्वच्छतेमध्ये देशात नेहमीच मानांकन उंचावत ठेवले असून सातत्यपूर्ण उत्तम कामगिरीमुळे 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत 'सुपर स्वच्छ लीग' या नव्याने निर्माण केलेल्या विशेष कॅटेगिरीमध्ये नवी मुंबईसह देशातील तीन शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

आता 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' ची प्रक्रिया सुरू झाली असून यामध्ये एक महत्वाचा भाग म्हणजे 'नागरिकांचा प्रतिसाद ' नोंदविण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे. याकरिता स्वच्छ भारत मिशनमार्फत जाहीर करण्यात आलेल्या पोर्टलवर अर्थात https://sbmurban.org/feedback या लिंकवर क्लिक करून नागरिकांनी शहर स्वच्छतेविषयीचा आपला अभिप्राय वेबसाईटवर नोंदवायचा आहे.

यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपल्या मोबाईलवरून नवी मुंबई शहराच्या देशातील सर्वोच्च मानांकनासाठी सर्वेक्षणात विचारल्या जाणाऱ्या १० प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे देऊन आपल्या नवी मुंबई शहराचे मानांकन उंचवावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याकरिता नवी मुंबई महापालिकेच्या वतीने प्रतिसाद नोंदविण्यासाठी नागरिकांपर्यंत वेबसाईटची लिंक तसेच क्यू आर कोड विविध माध्यमांचा वापर करून पोहचविण्यात येत आहे.

याकरिता ठिकठिकाणी फलक लावून तसेच स्टँडी ठेवून क्यू आर कोड प्रदर्शित करण्यात आले असून चित्रपटगृहांमध्येही क्यूआर कोडची




व्हिडिओ क्लिप प्रसारित करण्यात आली आहे. याशिवाय नाट्यगृह तसेच सिग्नलवर ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांनी अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

शाळांमध्येही विद्यार्थ्यांद्वारे पालकांना आवाहन करण्यात आले असून महाविद्यालये व शैक्षणिक संस्था येथे जाऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अभिप्राय नोंदविण्यावर भर दिला जात आहे. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सोसायट्यांमध्ये जाऊन नागरिकांचे अभिप्राय नोंदवण्यासाठीही विशेष पथके कार्यरत आहेत.

विशेषत्वाने शनिवार व रविवार नागरिकांना सुट्टी असते हे लक्षात घेऊन ही पथके अधिक प्रभावीपणे काम करीत असून मॉल्स तसेच वंडर्स पार्क, रॉक गार्डन, ज्वेल ऑफ नवी मुंबई यासारखी गर्दीची उद्याने तसेच विविध उत्सव साजरे होतात अशी ठिकाणे येथेही ही पदके जाऊन नागरिकांना प्रतिसाद नोंदवण्यासाठी प्रोत्साहित करीत आहेत.

नवी मुंबई शहराचे मानांकन उंचावण्यासाठी नागरिकांचा प्रतिसाद ही एक महत्वाची बाब असून जागरूक नागरिकांकडून प्रतिसाद नोंदवण्यासाठी उत्तम सहकार्य लाभत आहे.

आपल्या शहराचे मानांकन उंचाविण्यासाठी सर्वेक्षणाच्या गुणांकनात प्रत्येक नवी मुंबई नागरिकाने एक सामाजिक जबाबदारी म्हणून नागरिकांचा प्रतिसाद (Citizen Feedback) अंतर्गत https://sbmurban.org/feedback लिंकवर अथवा क्यू आर कोडवरून १० प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे नोंदवावीत तसेच आपले कुटुंबिय, मित्र – परिवार, कार्यालयीन सहकारी यांनाही अभिप्राय नोंदविण्यास सांगावे व प्रोत्साहीत करावे तसेच प्रतिसाद नोंदविण्यासाठी आपल्याशी संपर्क साधणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधींस संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.





**चौक : भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर व स्मिता ठोंबरे यांची कन्या चौकच्या सरपंच रितू ठोंबरे यांचा विवाह कर्जतमधील मोना नंदकुमार मोरे यांचे चिरंजीव हर्षल यांच्यासोबत नुकताच झाला. या विवाह सोहळ्यावेळी भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष व माजी मंत्री रवींद्र चव्हाण, वन व पर्यावरण मंत्री गणेश नाईक, मंत्री भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी, आमदार व माजी मंत्री रविशेठ पाटील आदी मान्यवरांनी उपस्थित राहून वधूवरांना शुभाशिर्वाद दिले.**

# फुंडे वीर वाजेकर महाविद्यालयात मुंबई विद्यापीठ कमिटीची भेट

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

मुंबई विद्यापीठ एलआयसी कमिटी महाविद्यालयांमध्ये शनिवारी (दि.२२) रसायनशास्त्र विभागात संशोधन करण्यासाठी व रसायनशास्त्र विभागातील सर्व उपकरणे यांची पाहणी करून त्याचबरोबर संशोधन कामासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी महाविद्यालयांमध्ये आहेत, याची खात्री करण्यासाठी मुंबई विद्यापीठामार्फत एलआयसी कमिटी चेअरमन प्रोफेसर राजेश कांबळे, मेंबर म्हणून मुंबई रसायनशास्त्र विभाग मुंबई



विद्यापीठ प्रोफेसर विश्वनाथ पाटील यांनी प्रत्यक्ष भेट दिली. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी सर्व कमिटी चेअरमन व सदस्य यांचे स्वागत केले.

महाविद्यालयामध्ये दैनंदिन जीवनाशी निगडित संशोधन कसे करावे यासंदर्भात माहिती दिली रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉक्टर स्मिता तांदळे मॅडम यांनी सर्व कागदपत्र व संशोधन करण्यासाठी लागणाऱ्या सर्व माहिती कमिटीला दिली.

या वेळी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक यशवंत गायकवाड प्राध्यापक डॉ.मर्याप्पा सोनवणे प्राध्यापिका चेतना तुंबडे तसेच रसायनशास्त्र विभागातील संशोधन प्रकल्पाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. गुरमीत वधवा यांनी आभार मानले.

# 'विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्या'

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील एका महाविद्यालयात परीक्षेदरम्यान पर्यवेक्षक प्राध्यापकाने १६ वर्षीय विद्यार्थिनीशी केलेल्या आक्षेपार्ह वर्तनाच्या घटनेबाबत तातडीने चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना केली आहे.

या संदर्भात डॉ. गोऱ्हे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांनी या प्रकरणातील आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करून अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

विद्यार्थिनींवरील कोणत्याही प्रकारच्या लैंगिक अत्याचारासंदर्भात कठोर पावले उचलली जातील आणि दोषींना कडक शिक्षा होईल, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल, असेही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट केले आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सुकापूर पाली देवद ग्रामपंचायतमध्ये विकासाची गंगा आली आहे. त्या अनुषंगाने सुवर्णभूमी सोसायटीच्या मागील रस्त्याच्या कामाची माजी जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हाध्यक्ष उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा अमित जाधव, सुकापुर गाव भाजप अध्यक्ष राजेश पाटील, बूथ अध्यक्ष सुकापुरचे संजय पाटील त्यांनी येऊन पाहणी केली.**

# 'रोटरी'तर्फे पनवेल शहर पोलीस ठाण्याला वॉटर कुलर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे वॉटर कुलर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या वतीने देण्यात आला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे येणाऱ्या तक्रारदार व अर्जदार अभ्यंगासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून वॉटर कुलर कोणत्या सामाजिक संस्थेकडून मिळेल का अशी विनंती पोलीस ठाण्याकडुन पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्याकडे केली होती. याचा त्वरित



पाठपुरावा करून जवळपास ५० हजार रुपये किमतीचा वॉटर कुलर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्यामार्फत मंजूर करून घेऊन तो पोलीस ठाणाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर बसविण्यात आला आहे.

वॉटर कुलरचे उद्घाटन रोटरी ३१३१ चे जिल्हा गव्हर्नर शीतल शाह, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पो. नि.शाकीर पटेल, जिल्हा प्रथम महिला रागिणी शाह, सहाय्यक गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पीडीजी डॉ. गिरीश गुणे, अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, डॉ.आवटे, रोटेरियन आणि अनस, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल सदस्य तसेच पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, रायगड प्रेस क्लब जिल्हा सल्लागार संजय कदम, सचिव दत्तात्रेय कुलकर्णी, खजिनदार राकेश पितळे, सल्लागार विजय पवार, प्रतिक वेदपाठक आदी उपस्थित होते.

# भगत ब्रदर्सतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**उरण : बातमीदार**

भगत ब्रदर्सच्या सौजन्याने मर्यादित षटकांचे क्रिकेटचे सामने उरण मध्ये आयोजित करण्यात आले होते. या सामन्यातुन आलेल्या नफ्यातुन सामजिक बांधीलकी म्हणुन समाजकार्याची अखंड परंपरा जोपासत भगत ब्रदर्स ग्रुपच्या वतीने रा. जि.प. शाळा खोपटेतील पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहीत्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी भगत ब्रदर्स परिवाराचे मिथुन निळकंठ भगत, मनिष भगत, श्रेयश भगत पिंकेश भगत, जितेंद्र भगत, मिलिंद भगत, महेंद्र भगत व मित्र परिवार उपस्थित होते. यापूर्वी भगत ब्रदर्स परिवाराने आपल्या परीने छोटे मोठे अनेक



सामाजिक उपक्रम राबविले आहेत. या वर्षी प्रथमच क्रिकेट स्पर्धेतून मिळालेली रकमेतून (नफ्यातुन) शैक्षणिक साहित्य वाटपचा कार्यक्रम त्यांनी केला आहे.

भगत ब्रदर्सने केलेल्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून असे सामाजिक कार्यक्रम क्रिकेटच्या नफ्यातून सर्वत्र झाले पाहिजेत, अशी भावना जनतेनी व्यक्त केली आहे.

# न्हावे गावातील प्रकल्पग्रस्त उपोषणाची मंत्री भरत गोगावलेंकडून दखल; चर्चेनंतर उपोषण मागे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील न्हावे गावातील प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांच्या उपोषणाची मंत्री भरत गोगावले यांनी दखल घेतल्यावर लोणेरे विद्यापीठाचे कुलगुरू यांच्या समवेत सकारात्मक चर्चेनंतर कर्मचाऱ्यांनी उपोषण मागे घेतले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे न्हावे गावचे प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांनी दिनांक २० व २१ मार्च २०२५ रोजी त्यांच्या न्याय हक्क मागण्यासाठी उपोषण केले होते. काही शेतकरी भूमीहीन झालेले आहेत मात्र अद्यापपर्यंत विद्यापीठाने त्यांच्या मुलांना कायमस्वरूपी नोकरी दिलेली नाही. काही कर्मचारी २० वर्षापेक्षा जास्त काळ तात्पुरत्या स्वरूपावर काम करीत आहेत. त्यांच्या उपोषणाची दखल रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी घेऊन त्यांचे प्रतिनिधी म्हणून रायगड जिल्हा शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण चाळके हे विद्यापीठाचे कुलगुरू समवेत उपोषण ठिकाणी हजर होऊन त्यांच्याकडे चर्चा केली. सकारात्मक चर्चा झाल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. लवकरच याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले.



## दोन मुलींना फुस लावून पळवले; महाडमधली घटना

**महाड, पोलादपुर : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कांबळे तर्फे महाड या गावातील दोन अल्पवयीन तरुणींना कोणीतरी अज्ञात इस्मानी पळवून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे



महाड एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल केशव गायकर वय ३८, राहणार कांबळे तर्फे महाड मूळचे राहणार कात्रज पुणे यांनी काल मध्यरात्री दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या दोन मुली अमृता अनिल गायकर वय १६ व नम्रता अनिल गायकर वय १७ यांना कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी मुलींच्या वडिलांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली आहे.

याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल झाला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक जे एच माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुर्वे हे अधिक तपास करीत आहेत.

## माणगाव येथे महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे शुक्रवारी (दि.२१) महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य शिबिरात ताणतणाव, मानसिक आरोग्य, कान – नाक – घसा, त्वचा व गुप्तरोग, मणके व सांध्याचे आजार, पाळी, गर्भाशय आजार, वंध्यत्व, मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉईड, हृदयरोग, थर्मल मेमोग्राफी, किडणी विकार, कर्करोग, नेत्र, रक्त, दंत तपासणी, इ. सी. जी. इत्यादी तपासण्या डॉक्टरांच्या सल्ल्याने करण्यात आल्या. या शिबिरात एम.जी.एम., कामा, तेरणा, शंकराचार्य व इतर हॉस्पिटल सहभागी झाले होते.

या वेळी रा. काँ. कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुकाध्यक्ष काका नवगणे, माजी नगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक आनंद यादव, महिला अध्यक्ष संगीता बक्कम, शहर अध्यक्ष नितीन वाढवल, महिला शहर अध्यक्षा योगिता चव्हाण,

उपाध्यक्ष श्रद्धा यादव, जेष्ठ नेते राम टेंबे, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, नगरसेविका रिया उभारे, रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, सुमित काळे, हेमंत शेठ, मा. पं. स. स. शैलेश भोनकर, देविका पाबेकर आदी राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वनसंवर्धन व वनवणव्याचे दुष्परिणामा बाबत मार्गदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जागतिक वन दिवसानिमित्त वनविभाग पोलादपूर यांच्या माध्यमातून तालुक्यातील मोरसडे येथील कांगोरीगड माध्यमिक विद्यालयामध्ये वनाचे संरक्षण व संवर्धन, वनवणव्यामुळे होणारे दुष्परिणाम वाढता वन्यजीव मानव संघर्ष याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

रोहा उप वनसंरक्षक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव, सहाय्यक वनसंरक्षक रोहित चौबे, वनक्षेत्रपाल विकास भामरे, महाडचे वनक्षेत्रपाल राकेश साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली मोरसडे येथील कांगोरीगड माध्यमिक विद्यालयामध्ये जावून हा कार्यक्रम यशस्वी केला. पोलादपूर वनपाल परिमंडळ वनाधिकारी बाजीराव पवार, पोलादपूर तपासणी नाका वनरक्षक जयवंत वाघमारे, गोविंद खेडकर, देविदास त्रिभुवन, करंजे वनरक्षक नवनाथ मेटकरी, पोलादपूर वनरक्षक संदिप परदेशी, कोतवाल वनरक्षक अमोल रोकडे, देवळे वनरक्षक भीमराव गायकवाड यांनी विशेष प्रयत्न केले. याप्रसंगी माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य अनिल नलावडे यांच्यासह कांगोरीगड माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक वृंद, शालेय कर्मचारी, शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ मोठया संख्येने हजर होते.



## श्री स्वयंभू वाकडाई मंदिराचा जीर्णोध्दार आणि कलशारोहण सोहळा उत्साहात



**माणगांव : बातमीदार**

निळज धरणाचीवाडी येथे ग्रामस्थांच्यावतीने श्री स्वयंभू वाकडाई मंदिराचा जीर्णोद्धार आणि कलशारोहणाचा सोहळा आनंदात संपन्न झाला. खालूच्या तालावर लेझीम खेळत आनंदात उत्साहात देवीची पालखीत भव्य मिरवणुक काढण्यात आली.

रविवार ( दि.१६ ) रोजी श्री स्वयंभू वाकडाई मंदिर भव्य जीर्णोध्दार सोहळ्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८ वा. अभिषेक, सकाळी ९ वा. देवळाचे कळसपुजन, सकाळी १० वा. होमहवन, सकाळी ११ वा. कलशारोहण, दुपारी १२ वा. सत्यनारायणाची पुजा, दुपारी १ वा. महाप्रसाद, रात्री १० वा. उणेगाव भजन मंडळाचे भजन असा भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात आला होता. भटजी प्रसाद खैरे गुरूजी यांनी सगळे धार्मिक विधी उत्तम रित्या पार पाडले.

निळज धरणाचीवाडी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, मुंबई मंडळ यांनी अतिशय उत्तम व्यवस्थापन करून हे शुभ कार्य सिद्धीस नेले. मंदिराचे जीर्णोद्धार कार्य यशस्वीरित्या पूर्ण झाले, ज्याने मंदिराला नवीन रूप प्राप्त झाले आहे. अनेक भाविकांनी या सोहळ्यात मोठ्या उत्साहाने भाग घेतला, ज्यामुळे वातावरण खूपच धार्मिक आणि आनंदमय झाले होते.

## स्वामीत्व शुल्क बंद असताना कर्जतमध्ये वाळूचा उपसा सुरूच

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीचे लचके काढण्याचे काम रेती उत्पादकांकडून सुरु आहे. सध्या कर्जत तालुक्यात जागोजागी रेती माफिया यांच्याकडून उल्हास तसेच पोश्री नदीमध्ये देखील उत्खनन सुरु आहे. शासनाने रेती उत्खनन करण्यासाठी स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) बंद केले आहे आणि त्यामुळे रेती उत्खनन अनधिकृतपणे केलं जात असून महसूल विभागाकडून त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे दिसते.



शासनाने राज्यात रेती उत्खनन करण्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे बांधकाम साहित्य महाग झाले आहे. मात्र असे असताना कर्जत तालुक्यात रेती उत्खनन करण्याचे प्रमाण मोठे असून उल्हास नदी आणि पोश्री नदीमध्ये रेती उत्खनन दिवसाढवळ्या सुरु आहे. कर्जत तालुक्याच्या मध्यभागातून उल्हास नदी वाहते आणि हि नदी ज्या भागात उगम पावते त्या भागातून सुरु होणारे रेती उत्खनन नदी ठाणे जिल्ह्यात प्रवेश करते त्या भागापर्यंत कायम आहे.त्यात कर्जत तालुक्यात उल्हास नदीच्या पात्रात काढली जाणारी वाळू कोणत्याही प्रकारचे स्वामित्व शुल्क कर भरून काढली जात नाही आणि त्यामुळे अनधिकृतपणे वाळू उत्खनन केले जात असताना महसूल विभागाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यात महसूल विभागाचे तलाठी आठ दहा गावांसाठी नेमलेले आहेत. आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मंडल अधिकारी देखील ग्रामीण भागात असून अनधिकृतपणे तालुक्याच्या बहुसंख्य भागात माती आणि रेती उत्खनन सुरु आहे. महसूल खाते रेती उतखन्नन होत असताना मूग गिळून गप्प असल्याने मोठे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मात्र नदीमध्ये जेसीबी पोकलेन मशीन यांचा वापर करून सुरु असलेले उत्खनन महसूल विभागाला दिसत नाही काय? असा सवाल पर्यावरण प्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.

> **नदीमधून वाळू काढण्याचे काम सुरू आहे. असे समजताच त्या परिसरातील मंडल अधिकारी व तलाठी यांना तातडीने चौकशीसाठी पाठविण्यात आले असून हे प्रकार बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दोषींवर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत**
>
> **– धनंजय जाधव, तहसीलदार कर्जत**

## महाराष्ट्र दिशा समिती सदस्यपदी सामाजिक कार्यकर्ते सत्यवान शिंदे



**पोलादपुर : प्रतिनिधी**

ग्रामीण विकास मंत्रालयाने प्रसिद्ध सामाजि कार्यकर्ते सत्यवान व्ही. शिंदे यांची राज्यस्तरीय दिशा समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. दिशा समिती ही केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाची निरीक्षक समिती आहे जी ग्रामीण भारतात राबविल्या जाणाऱ्या विविध विकास कामांवर देखरेख करते.

महाराष्ट्र जनता दल (एस) चे कार्यकारी अध्यक्ष सुरेंद्रकुमार बाजपेयी यांनी जोगेश्वरी येथे झालेल्या कार्यक्रमात सत्यवान शिंदेचा सत्कार केला.

बाजपेयी यांनी शिंदे यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ग्रामीण प्रकल्पांवर निरीक्षक म्हणून काम करण्यासाठी शिंदे यांच्याकडे आवश्यक कौशल्य असल्याने राज्य सरकारला ग्रामीण प्रकल्प कार्यक्षमतेने राबविण्यास मदत होईल.

यावेळी महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेचे सचिव मनीष चव्हाण,भाजपचे वॉर्ड अध्यक्ष भूषण चव्हाण, केरळ मुंबई उत्कर्ष सभेचे अध्यक्ष रूपेश कृष्णन, व्यापारी दीपक गुप्ता आदी उपस्थित होते.

## हवामान बदल दिनाचे महत्त्व विषद करण्यासाठी १२ वर्षीय सायकलपटूची जनजागृती मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक हवामान दिनाच्या निमित्ताने हवामान बदलामुळे मानवी जीवनावर होणारे परिणाम यामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे. याबद्दल जनजागृती करण्यासाठी नेरळ गावातील १२ वर्षीय विद्यार्थ्याने नेरळ गावात जनजागृती मोहीम राबविली. आपल्या सायकल वरून ही मोहीम राबविताना हिरेन राम हिसालगे याने स्वतःचा सायकलला हवामान बदलास कारणीभूतठरत असलेल्या विविध प्रकारच्या वस्तू आपल्यासोबत घेऊन चौका चौकात थांबून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

नेरळ गावातील विद्या विकास मंदिर शाळेचा विद्यार्थी असलेला हिरेन राम हिसालगे हा सातवी इयत्तेत शिकत असून त्याला सायकल चालवण्याचे वेड आहे. त्याने अनेक यशस्वी सायकल मोहिमा केल्या असून आजच्या दिवसाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन हवामान बदलास कारणीभूत असलेल्या विषयावर जनतेने गांभीर्याने विचार करावा यासाठी सायकल फेरी काढली. नेरळ पोलीस ठाणे येथे प्रभारी पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी या सायकल फेरीला हिरवा झेंडा दाखवला आणि त्याची हवामान बदल जनजागृती रॅली सुरू झाली.

नेरळ पोलीस ठाण्यातून निघालेली सायकल आणि त्या सायकली सोबत हिरेन याने हवामान बदलाला कारणीभूत असलेल्या आपल्या वस्तू सोबत घेतल्या होत्या. पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज ओळखून हिरेनने स्वतःला एका पिपीकिट मध्ये पूर्ण झाकून घेतले होते. पाठीवर ऑक्सिजन सिलेंडर तोंडावर



ऑक्सीजन नळकांडी यातून मानवी आयुष्य भविष्यात कसे असेल याची जाणीव करून देत होता. भविष्यात हीच परिस्थिती उद्भवू नये यासाठी त्याने झाडे लाव झाडे जगवा म्हणून संदेश देण्याचा प्रयत्न करीत होता. कर्जत तालुक्याला नैसर्गिक संपदा टिकवून ठेवण्यासाठी आणि बारमाही वाहती असलेली उल्हासनदी मधील प्रदूषण रोखण्यासाठी उल्हास नदी बचाव ची मोहीम देखील त्यातून विषद केली होती.

नेरळ पोलीस ठाणे येथून ही जन संदेश देणारी सायकली फेरी विद्या विकास शाळेत पोहचली. तेथे संस्थेचे पदाधिकारी अमित जोगळेकर आणि मुख्याध्यापिका विनया काकडे यांनी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ही सायकली फेरी जनजागृती करीत चौका चौकात थांबून सायकलपटू हिरेन हा जनतेला हवामान बदल आणि त्याचे दुष्परिणाम याबाबत माहिती देत होता. नेरळ टॅक्सी स्टँड,नेरळ खांडा हनुमान मंदिर,छत्रपती शिवाजी महाराज चौक,विविध सोसायट्या असे तब्बल तीन तास जगजागृती अभियान सुरू होते. नेरळ गावातून एस टी स्टँड आणि नंतर साई मंदिर नाका शेवटी तेथून सगुणा बाग अशी ही सायकल जनजागृती फेरी झाली.

या फेरीमध्ये जागोजागी स्थानिकांनी हिरेनचे कौतुक करीत होते. तसेच शुभेच्छा देणारे मोठ्या प्रमाणात होते. त्यात शाळांचे विद्यार्थी हे हिरेन कडून हवामान बदल आणि त्यानंतर होणारे परिणाम याबद्दल समजून घेत होते. या मोहिमेत त्याचे वडील राम हिसालगे तसेच काका ॲड. विशाल तसेच सामाजिक कार्यकर्त्या कल्पना हिलाल हे सर्व सोबत चालत होते.

# आरसीबीची विराट विजयी सलामी

## गतविजेत्या केकेआरचा पराभव

**कोलकाता : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने विजयाने सुरुवात केली आहे. आरसीबीने केकेआरला त्यांच्या घरच्या मैदानावर सात विकेट्सने पराभूत केले. आरसीबीने तीन वर्षांनंतर केकेआरवर शानदार विजय मिळवला आहे.

विराट कोहली आणि फिल सॉल्टची ९५ धावांची भागीदारी अन् विराट कोहलीच्या धावांसह आरसीबीने पहिल्याच सामन्यात उत्कृष्ट विजय नोंदवला. गतविजेत्या केकेआर संघाला अटीतटीची लढत देत सामन्यात दणक्यात पुनरागमन करत मोठा विजय नोंदवला. पहिल्याच सामन्यात आरसीबीने चमकदार कामगिरी करत गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा पराभव केला.

ईडन गार्डन्सवर झालेल्या सलामीच्या सामन्यात केकेआरने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १७५ धावांचे लक्ष्य दिले होते. आरसीबीने हे लक्ष्य अवघ्या १६.२ षटकांत गाठले. विराट आणि सॉल्टने वादळी सुरुवात करत ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली.



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या या दमदार विजयात फिल सॉल्ट, विराट कोहली, कृणाल पंड्या आणि नवा कर्णधार रजत पाटीदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तिघांनीही आपल्या स्फोटक फलंदाजीने सामन्यात एकतर्फी विजय मिळवला आणि केकेआरला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. १७ धावांचा पाठलाग करताना सॉल्ट आणि कोहलीने पहिल्या सहा षटकांत ८० धावा केल्या. दोघांनी ८.३ षटकांत ९५ धावांची सलामी भागीदारी रचली.

१८०च्या स्ट्राईक रेटने ३१ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ५६ धावा करून सॉल्ट वरुण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर बाद झाला. देवदत्त पडिक्कलही १० चेंडूत १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला, पण या दोघांच्या बाद झाल्याचा बंगळुरूवर फारसा परिणाम झाला नाही. यानंतर आलेल्या कर्णधार रजत पाटीदारने १६ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकारासह ३४ धावा करत संघाचा विजय सोपा केला. याशिवाय लियाम लिव्हिंगस्टोनने पाच चेंडूत दोन चौकार आणि एका षटकारासह १५ धावा करत संघाला विजय मिळवून दिला. या विजयात विराट कोहलीची भूमिका महत्त्वाची होती. सलामीला आलेला विराट ३६ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ५९ धावा करत नाबाद परतला.

बंगळुरूने कोलकाताविरुद्ध आयपीएलमध्ये तीन वर्षांनंतर विजय मिळवला आहे. यापूर्वी २०२२च्या मोसमात आरसीबीने केकेआरचा पराभव केला होता. या दमदार विजयासह आरसीबीने गुणतालिकेत आपले खातेही उघडले आहे. आरसीबीने १७व्या षटकात हा सामना जिंकल्याने त्यांचा नेट रन रेटही चांगला झाला आहे.

# आयपीएलमध्ये विराटचा अनोखा 'चौकार'

## चार संघांविरुद्ध ठोकल्या एक हजार धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

आरसीबीचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आयपीएल इतिहासात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो आजवर कोणत्याच खेळाडूला जमलेला नाही. विराटने केकेआरविरूद्ध सामन्यात ३८ धावा करत आयपीएलमध्ये या संघाविरूद्ध १००० धावा पूर्ण केल्या.

केकेआरने चांगली फटकेबाजी केली, पण आरसीबीने ज्या पद्धतीने सामन्यात पुनरागमन केले ते पाहण्यासारखे होते. यादरम्यान लक्ष्याचा पाठलाग करतान विराट कोहलीने मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे.



आयपीएल २०२५चा सलामीच्या सामन्यात चेस मास्टर विराट कोहलीने नाबाद परतत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. आरसीबीने केकेआरवर सात विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. केकेआरने दिलेल्या १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने १६.२ षटकांत तीन विकेट्स गमावत महत्त्वपूर्ण विजय नोंदवला. लक्ष्याचा पाठलाग करतान विराट कोहलीने मोठी कामगिरी आपल्या नावे केली आहे. यासह विराट कोहलीने आयपीएलच्या इतिहासात चौथ्या संघाविरूद्ध १००० धावांचा टप्पा गाठला आहे. त्याच्याशिवाय कोणत्याच फलंदाजाला ही कामगिरी करता आलेली नाही.

विराटने आतापर्यंत चेन्नई सुपर किंग्स, दिल्ली कॅपिटल्स, कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स या संघांविरूद्ध ही कामगिरी केली आहे. विराटशिवाय डेव्हिड वॉर्नर आणि रोहित शर्मा यांनी प्रत्येकी दोन संघांविरूद्ध १००० धावांचा टप्पा गाठला आहे.

# आसाम क्रिकेटसाठी सुवर्ण क्षण!


## कसोटी आणि वर्ल्ड कप सामन्यांचे पहिल्यांदाच भूषवणार यजमानपद

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

गुवाहाटी हे आसाममधील सर्वात मोठी शहर. येथील गुवाहाटी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर येत्या नोव्हेंबरमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामन्याचे यजमानपद भूषवणार आहे. त्यामुळे ईशान्य भारतातील गुवाहाटी हे पहिले कसोटी क्रिकेटचे ठिकाण ठरणार आहे, अशी माहिती बीसीसीआयचे सरचिटणीस देवजित सैकिया यांनी दिली.

यंदाच्या आयसीसी महिला वनडे वर्ल्ड कप दरम्यान गुवाहाटीला पहिल्यांदाच वर्ल्ड कप सामन्यांचे यजमानपद मिळणार आहे. गुवाहाटीमध्ये आतापर्यंत कसोटी किंवा वर्ल्ड कप सामने झालेले नाहीत. मात्र, शनिवारी झालेल्या बीसीसीआयच्या सर्वोच्च समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, यावर्षी हे दोन्ही सामने गुवाहाटीमध्ये खेळवले जातील, असे सैकिया यांनी सांगितले.

भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेतील दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून आसाम क्रिकेट असोसिएशन (-उ-) स्टेडियममध्ये



खेळवला जाणार आहे. तसेच, गुवाहाटीमध्ये आयसीसी महिला वनडे वर्ल्ड कपचे पाच ते सहा सामने होणार आहेत. हे ईशान्य भारतातील पहिले वर्ल्ड कप क्रिकेट सामने असतील. महिला वर्ल्ड कप २४ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान होणार असून त्याचे वेळापत्रक अंतिम टप्प्यात आहे. गुवाहाटीला यजमानपद देण्याचा निर्णय घेतला गेला आहे, असे सैकिया म्हणाले. त्यांनी आयसीसी अध्यक्ष जय शाह आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचे आभार मानले आणि गुवाहाटी क्रिकेटसाठी एक प्रमुख स्थळ म्हणून उदयास येत असल्याचे सांगितले.

गुवाहाटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमचा इतिहास समृद्ध आणि उल्लेखनीय आहे. हे स्टेडियम आसाम क्रिकेट असोसिएशन (-उ-)च्या अधिपत्याखाली असून, ईशान्य भारतातील क्रिकेटसाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे. डॉ. भूपेन हजारिका क्रिकेट स्टेडियम, ज्याला आसाम क्रिकेट असोसिएशन स्टेडियम म्हणूनही ओळखले जाते, हे आसाममधील एक प्रमुख क्रिकेट मैदान आहे. या स्टेडियमची स्थापना २०१२ मध्ये करण्यात आली असून, ते राज्यातील सर्वात मोठ्या क्रीडा संकुलांपैकी एक आहे. हे स्टेडियम सुमारे ४०,००० प्रेक्षक बसण्याची क्षमता असलेले असून, येथे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामने खेळवले जातात. या मैदानाच्या दोन प्रमुख टोकांना 'मीडिया एंड' आणि 'पॅव्हेलियन एंड' अशी नावे देण्यात आली आहेत. स्टेडियममध्ये २०१७ मध्ये आधुनिक फ्लडलाईट्स बसवण्यात आल्या, ज्यामुळे येथे दिवस-रात्र सामने खेळवण्याची सुविधा उपलब्ध झाली. हे मैदान आसाम क्रिकेट संघाचे अधिकृत घरचे मैदान असून, क्रिकेट क्षेत्रात राज्याची ओळख निर्माण करण्यात या स्टेडियमचा मोठा वाटा आहे. आता, २०२५ मध्ये गुवाहाटी येथे पहिल्यांदाच कसोटी सामना आणि महिला वनडे वर्ल्ड कपच्या सामन्यांचे आयोजन होणार असल्याने हे मैदान अधिक प्रतिष्ठित ठरणार आहे.

# लखनऊ सुपरजायंट्सचे दोन प्रमुख खेळाडू सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धेला रविवारपासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेतील पहिल्याच लढतीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स हे दोन्ही संघ भिडले. या स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वीच ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या लखनऊ सुपरजायंट्स संघाला मोठा धक्का बसला आहे.

मयांक यादवनंतर आणखी दोन खेळाडू सुरुवातीच्या तीन सामन्यांमधून बाहेर झाले आहेत, तर मोहसिन खानच्या जागी शार्दुल ठाकूरचा संघात समावेश करण्यात आला असल्याची माहिती समोर येत आहे, मात्र याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

भारताचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूर गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. शार्दुल आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात कुठल्याच संघाने बोली लावली नव्हती. त्यामुळे तो अन्सोल्ड राहिला होता. त्यानंतर तो लखनऊ सुपर जायंट्स संघासोबत दिसून आला होता. त्यामुळे शार्दुल लखनऊकडून खेळणार असल्याची चर्चा रंगली होती. आता तो याच संघाकडून खेळणार असल्याचा माहिती समोर येत आहे.

लखनऊ सुपर जायंट्स संघाचे टेन्शन वाढवणारी बातमी म्हणजे, वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि आवेश खान स्पर्धेतील सुरुवातीच्या तीन सामन्यांसाठी उपलब्ध नसणार आहेत. सुरुवातीचे तीन सामने झाल्यानंतर हे दोन्ही खेळाडू खेळताना दिसून येऊ शकतात. यापूर्वी मयांक यादवदेखील दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडणार असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे लखनऊला मोठा धक्का बसला होता. आता या संघाला तिहेरी धक्का बसला आहे. माध्यमातील वृत्तानुसार तो १५ एप्रिलपर्यंत फिट होऊन मैदानावर कमबॅक करू शकतो.

लखनऊचा सर्वात वेगवान गोलंदाज मयांक यादव अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे तो सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार, तर आकाश दीप एनसीएमध्ये आहे. संघातील प्रमुख गोलंदाज दुखापतग्रस्त असल्यामुळे आता लखनऊला शार्दुलचा संघात समावेश करावा लागणार आहे.

# विराट कोहली आयपीएलच्या ओपनिंग सेरेमनीमध्ये थिरकला

## शाहरूख खानबरोबर केला डान्स



**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १८व्या हंगामाला सुरुवात झाली आहे. पहिल्या सामन्यापूर्वी कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर ओपनिंग सेरेमनी झाली. अनेक कलाकारांनी आपल्या परफॉर्मन्सने ओपनिंग सेरेमनीची शोभा वाढवली. विराट कोहलीनेही शाहरूख खानबरोबर डान्सने महफिल लुटली.

ईडन गार्डन्स हे गतविजेते कोलकाता नाईट रायडर्स संघाचे होम ग्राऊंड आहे. या ओपनिंग सेरेमनीची सुरुवात शाहरूख खानने केली. शाहरूख हा केकेआर संघाचा सहमालक आहे. शाहरूखच्या भाषणानंतर कार्यक्रम सुरू झाले. यामध्ये गायिका श्रेया घोषाल, बॉलीवूड अभिनेत्री दिशा पाटनी आणि रॅपर-गायक करन औलुजा यांनी वेगवेगळे परफॉर्मन्स सादर केले.

या कलाकारांच्या परफॉर्मन्सनंतर शाहरूख खान पुन्हा एकदा स्टेजवर आला. यानंतर शाहरूखने विराट कोहलीला स्टेजवर बोलावले. शाहरूखने विराटला त्याच्या पठाण या चित्रपटातील झुमे जो पठाण या गाण्यावर डान्स करायला लावले. विराटनेही त्याच्या या गाण्याची हुक स्टेप करत शाहरूखबरोबर डान्स केला. विराट हा आतापर्यंतच्या आयपीएलच्या सर्व १८ सीझनमध्ये खेळणारा खेळाडू आहे, तर या १८ वर्षात तो फक्त एकाच संघाकडून म्हणजेच आरसीबीकडून खेळला आहे. ही कामगिरी करणारा विराट एकमेव खेळाडू आहे. यासह विराट हा वरिष्ठ खेळाडू, तर केकेआरचा रिंकू सिंग हा नव्या दमाचा खेळाडू आहे.

# आयपीएलमधील माझी अखेरची फ्रँचायझी

## धोनीचे निवृत्तीबाबत मोठे विधान



**चेन्नई : वृत्तसंस्था**

महेंद्रसिंग धोनीने आता मुंबई इंडियन्सच्या सामन्यापूर्वी निवृत्तीबाबत एक मोठं वक्तव्य केलं आहे. महेंद्रसिंग धोनी हा गेल्या वर्षी निवृत्त होणार होता, असे म्हटले जात होते. या हंगामात चेन्नईचा पहिलाच सामना मुंबई इंडियन्ससारख्या बलाढ्य संघाबरोबर आहे, पण मुंबईच्या सामन्यापूर्वी धोनीने आता निवृत्तीबाबत एक मोठे वक्तव्य करत सर्वांनाच धक्का दिला आहे.

यंदाच्या आयपीएलपूर्वी धोनीची एक खास मुलाखत झाली आणि त्यामध्ये त्याला याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नावर उत्तर देताना धोनी म्हणाला की, चेन्नई सुपर किंग्स हा एक बलाढ्य संघ आहे. पण प्रत्येक ८-१० वर्षांनी प्रत्येक संघ बदलत असतो, तसे चेन्नईचे आहे. चेन्नईचा संघ माझ्यासाठी सर्वस्व आहे. चेन्नईच्या संघानेही मला पूर्ण स्वतंत्र्य दिले आहे. त्यामुळे जोपर्यंत मला खेळायचे असेल तोपर्यंत ते नक्कीच मला संधी देत राहतील. याबद्दल मी त्यांचे आभार मानायला हवे, पण या सर्व गोष्टींमध्ये मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, ही आयपीएलमधील माझी अखेरची फ्रँचायझी असणार आहे. यानंतर मी कोणत्याही संघाशी संलग्न राहणार नाही. त्यामुळे मी जरी निवृत्ती घेतली तर ती मी चेन्नई सुपर किंग्स या संघामधूनच घेईन आणि त्यानंतर आयपीएलमध्ये कुठल्याही संघाकडून खेळणार नाही. धोनीने या वेळी मुंबईच्या सामन्यापूर्वी निवृत्तीबाबत हे महत्वाचे वक्तव्य केले आहे. निवृत्ती घ्यायची किंवा नाही ते धोनीवरच अवलंबून असणार आहे.

धोनीसाठी चेन्नईचा संघ हे सर्वकाही आहे. त्यामुळे संघाला जोपर्यंत त्याची गरज आहे, तोपर्यंत धोनी हा खेळत राहणार आहे. त्यामुळे या वर्षीतरी धोनी निवृत्ती घेणार नाही, असे समजले जात आहे. पण धोनीला सर्वांना धक्का द्यायची सवय आहे. त्यामुळे धोनी यंदाच्या मोसमात निवृत्तीचा धक्का देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

# विराटसमोर चाहत्याचे मैदानात घुसून लोटांगण

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १८व्या हंगामाला दणक्यात सुरुवात झाली आहे. आरसीबीने गतविजेत्या केकेआरचा पराभव करत विजयाने मोहिमेचा श्रीगणेशा केला. या सामन्यात आरसीबीचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आपले अर्धशतक पूर्ण करताच अचानक एक चाहता मैदानात घुसला आणि त्याने विराटसमोर थेट लोटांगण घातले.

कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या पहिल्या सामन्यात आरसीबी संघाचे पूर्ण वर्चस्व दिसून आले, ज्यात त्यांनी सात विकेट राखून विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीला केकेआरने नक्कीच थोडा आक्रमक खेळ केला, पण आरसीबीने दणक्यात सामन्यात पुनरागमन केले आणि विजय मिळवून शेवट केला. केकेआरने दिलेल्या १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आरसीबीची नवी सलामी जोडी विराट कोहली आणि फिल सॉल्ट उतरली, ज्यांनी केकेआरच्या गोलंदाजांची पॉवरप्लेमध्ये धुलाई केली. या



दोघांनी पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची मोठी भागीदारी रचली.

दरम्यान, विराटने आपले अर्धशतक पूर्ण करताच अचानक त्याचा एक चाहता मैदानात घुसला. त्यामुळे खेळ काही काळ थांबवावा लागला. चाहता मैदानात घुसताच त्याने विराटसमोर थेट लोटांगण घातले. सुरक्षकर्मींनी चाहत्याला दूर केले.

झाले असे की, विराटने अर्धशतकाचे सेलिब्रेशन करण्यासाठी बॅट उंचावली आणि पुन्हा मैदानावर स्थिरावणार इतक्यात एका चाहत्याने मैदानात धाव घेतली. हा चाहता अचानक पिचच्या दिशेने धावत गेला आणि थेट विराटच्या पायाशी त्याने लोटांगण घातलले. यानंतर विराटने त्याला लगेच उचलले अन् चाहत्याने त्याला मिठी मारली. त्यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आणि पंचांनी त्याला सोडवत मैदानाबाहेर नेले. मैदानाबाहेर जाताना तो चाहता विराटला भेटल्याचा आनंद साजरा करताना दिसला.

# खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये नेमबाजीत महाराष्ट्राचा गोल्डन संडे

## आदिल, सागरला सुवर्णवेध; आर्चरी, पॉवरलिफ्टिंगमध्येही कामगिरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये सलग तिसरा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णमय ठरला. आर्चरीत आदिल अन्सारी, नेमबाजीत सागर कातळेने अव्वल यश संपादून गोल्डन संडे साजरा केला. आर्चरीत राजश्री राठोडने, पॉवरलिफ्टिंगमध्ये शुक्ला बीडकर, सोनम पाटीलने रौप्य पदके जिंकून दिवस गाजविला.

जवाहरलाल नेहरू स्टेडियम परिसरात सुरू असलेल्या आर्चरीत स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे मुंबईच्या आदिल अन्सारीने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. पुरूषाच्या डब्ल्यू १ प्रकारात सलग दुसऱ्या स्पर्धेत आदिलने सोनेरी यशाचा वेध घेतला.

लातूरच्या सागर कातळेने मिश्र १० मीटर एअर रायफल प्रोन एसएच १ प्रकारात सुवर्णपदकाचा वेध घेतला. २५१.३ गुणांची कमाई करीत प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेच्या सुवर्ण यशावर सागरने नाव कोरले.

पॉवरलिफ्टिंगमध्ये महिलांच्या ४१



किलो गटात महाराष्ट्राच्या शुक्ला बीडकर, सोनम पाटीलने रूपेरी यशाचे वजन पेलले.

कोल्हापूरच्या ३५ वर्षीय शुक्ला बीडकरने ५० किलो वजन उचलून सलग दुसऱ्या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. गुजरातची नयना राबरी ५१ किलो वजन उचलून सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. महिलांच्या ४५ किलो गटात कोल्हापूरच्या सोनम पाटीलने ५९ किलो वजनात रौप्यपदकाची कमाई केली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com